# द स्टींग ऑपरेशन

सत्याचे दुसरे नाव... अन्यायावर लेखणीचा घाव!

www.thestingoperationnews.com / Email - thestingoperationnews@gmail.com

संपुर्ण महाराष्ट्र, गोवा व कर्नाटक सिमावर्ती भागात मोठ्या प्रमाणावर प्रसारित होणारे प्रथम क्रमांकाचे आठवडापत्र

RNI NO. : MAHMAR/2012/45052 CDM/PUNE/SR/501/2012

पुणे ▪ वर्ष १३ वे ▪ अंक - ५ वा (जोडअंक) ▪ दिनांक - सोमवार २५ ऑगस्ट ते रविवार ३१ ऑगस्ट २०२५ ▪ पाने ४ ▪ किंमत : ५ रुपये



हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती

## श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट, पुणे.






## प्राणप्रतिष्ठापना

शुभहस्ते,



जया किशोरी
अध्यात्मिक वक्त्या

बुधवार,
दि. २७ ऑगस्ट, २०२५,
दुपारी १२:१५ वा.

आपले नम्र,



पुनीत बालन
विश्वस्त-उत्सव प्रमुख

निमंत्रक: अध्यक्ष, पदाधिकारी व सर्व कार्यकर्ते

# संपादकीय

# राहुलला हलक्यात घेऊ नका

नंदकिशोर शहाडे
मुख्य संपादक

साऱ्या संघ परिवाराला गांधींची दहशत आहे. महात्मा गांधींना फाळणीचे गुन्हेगार, नेहरूंना भोळसट स्वप्नवेडे, इंदिरा गांधींना हुकूमशहा आणि राजीव गांधींना अननुभवी म्हणून त्यांची बदनामी करणं एवढंच शस्त्र वापरून चालणार आहे का? राहुल मोठा नाही, क्षुल्लक आहे हे दाखवण्यासाठी त्याला पप्पू करुन टाकलं! आता तो रस्त्यावरच्या लढाईत उतरला आहे. रस्त्यावर कधीच आपण राहुल सारखे वागलो नाही. आपण शाखेत, बैठकांमध्ये, कुठल्या तरी मंदिरांच्या गाभाऱ्यामध्ये. कुठली सोंगटी कुठे टाकावी हे कौशल्य समजण्यात गंगा न्हाल्या सारखं झालं . बुध्दाचा काळ असो, इस्लामचा क्रिवा इंग्रजांचा- सोंगट्या फिरवत फिरवत किती दिवस चालणार आहे. ही लढाई म्हणजे लोकभावनांशी एकरूप होणं, दिसेल त्याला कवेत घेणं, दिलासा देणं, प्रेम देणं. हा आपला, तो परका असं राहुल करत नाही. बंद खोल्यांमध्ये कट-कारस्थाने रचून किती दिवस? त्या पुढे काय? तुम्ही राहुल ला हलक्यात घेऊ नका! हेच सांगायचे आहे. केवळ कौटिल्य गोत्राच्या लब्ध प्रतिष्ठित भद्रलोकांमध्ये.

रस्त्यावरच्या लढाईत राहुल गांधींना जिंकणं सोपं नाही. तो जनमाणसात मिसळतोय! त्यासाठी लागतं निर्व्याज मन,
निरलस भाव आणि अंत:करणातलं सच्चेपण. हे तुम्ही का करत नाही. कारण समाज हा माणसांनी बनलेला असतो, या जिवंत लोकांना दैनंदिन जीवन आपल्या स्वाभिमानानं जगायचं असतं, जगण्यासाठी जे काही लागतं ते कष्टानं मिळवायचं असतं, रोजचं जगणं रोजचंच मरणं हे त्यांचं प्राक्तन. ते जीवन थोडंसं सुखावह कसं होईल एवढंच त्याचं स्वप्न ! त्यांच्या या स्वप्नांशी जो समरस होईल तोच त्यांची मनं जिंकून घेईल.

तुमचं काय, नेहमी हस्तीदंती मनोऱ्यात. म्हाताऱ्या राजाच्या मरणानंतर राजगादीवर कुणाला बसवायचं, आज ईडीचा फासा कोणावर टाकायचा, सीबीआयचा भुंगा कोणाच्या आतून घालायचा! हे षडयंत्र रचण्यात तुमच्या पिढ्या खपत चालल्या. काँग्रेसने ही त्यावेळी हेच केलं असेल. पण तुम्ही ती परंपरा का बनवता. तुम्ही ताकतवार सत्ताकेंद्र आहात अजून अनेक वर्ष तुमच्यामध्ये पाखरूही येऊ शकत नाही असे चित्र असताना समाजात कुठनीतीचा मेसेज कशासाठी देता? आजही तुमचे उद्योग तेच.

अमेरिकेला खूष ठेवायचं, चीनचे गालगुच्चे घ्यायचे आणि इकडे पोलिसी बळावर नको



त्याला जेरीस आणायचे. बैठका-सभा, यात्रा-मेळावे कपट- कारस्थानं. आणि षडयंत्र ही तुमची आवडती क्रीडांगणं. तुम्ही तिथंच रमणारे. दीप प्रज्वलन आणि रांगोळ्या एवढीच तुम्ही संस्कृती मानली.

रस्त्यावर उपाशी पोटी हिंडणारे, रस्त्याच्या कडेला दगडाची उशी करून झोपी जाणारे कष्टकरी तुम्हाला कधी दिसलेच नाहीत. एकलव्याचा कुटिल वापर तुम्ही जरूर केलात. पण जंगलांमध्ये, डोंगर कपाऱ्यांमध्ये, ओढ्या-नाल्यांमधून निव्वळ एखाद्या मासोळीसाठी वणवण करणाऱ्या फाटक्या तुटक्या लोकांचाही तुम्ही वापर केला तो कुणाला तरी राजगादीवर बसवण्यासाठी, १५ लाखाचे चॉकलेट लोकं विसरली. तरीही तुमच्या पाठीशी आहेत. याचे भान ठेवा. नाहीतर राहुलच्या हाती एकदिवस देश द्यावा लागला तर वाईट वाटून घेऊ नका! कुणाला तरी हुसकावून लावण्यासाठी काहीही करू नका.

आता लढाई रस्त्यावरची आहे , थेट आहे. ती लढणं सोपे नाही. स्वतःला आरसा दाखवा आणि आता तरी सर्व कारस्थाने सोडून भल्याचा विचार करा. किती दिवस बंदूकीने झुरळ मारणार आहात. मोठ्या मनाने माफ करा! आपल्या संस्कृतीचा परिचय द्या! आणि डोक्यात हवा न जाऊ देता राहुल सारखे वागा! त्याला हलक्यात घेऊ नका. नाहीतर ससा आणि कासव यांचे उदाहरण तुमच्याबाबतीत एक दिवस देण्याची वेळ येईल.

## मूलांक ८ असलेल्या लोकांना वय ३५-४० नंतर मिळते मोठे यश




काही लोक इतके नशीबवान असतात, की ते श्रीमंती घेऊनच जन्माला येतात. अंकशास्त्रानुसार आज आम्ही अशा जन्मतारखेच्या लोकांबद्दल सांगणार आहोत, ज्यांचा जन्म जरी गरिबीत झाला, तरी त्यांच्या पाठीशी शनिदेव खंबीर असल्याने ते वयाच्या पस्तिशीनंतर कोट्यधीश बनतातच. शनीच्या कृपेने या लोकांवर कोणाची वाकडी नजरही पडत नाही.

अंकशास्त्रानुसार, तुमच्या जन्मतारखेच्या आधारे मूलांक काढला जातो आणि याद्वारे भविष्य आणि व्यक्तिमत्त्व इत्यादी सागितले जाते. मूलांक म्हणजे जन्मतारखेची बेरीज आहे. जसे १, १०, १९ आणि २८ ची बेरीज शेवटी १ अशी येईल, म्हणून या तारखांना जन्मलेल्या लोकांचा मूलांक १ असेल. असे मूलांक १ ते ९ आहेत. यामध्ये एक अशी संख्या आहे, ज्याचा स्वामी शनी आहे. ज्यांचा गरिबीत जन्म असूनही फरक पडत नाही, हे लोक ३५ वयानंतर कोट्यधीश बनतात. अंकशास्त्रानुसार त्या जन्मतारखेबद्दल जाणून घ्या...

अंकशास्त्रानुसार, मूलांक ८ चा स्वामी ग्रह शनी आहे. म्हणूनच, मूलांक घे ८ असलेल्या लोकांवर शनीचा विशेष प्रभाव आहे. तसेच, भगवान शनी या मूळ लोकांवर विशेष दयाळू आहेत

# बालन यांचे पुनीतकार्य समाजाला दिशा देणारे



**पुनीत बालन यांचे नाव घेताच समोर येतो पुण्यातील गणेशोत्सवाचा झगमगाट. खऱ्या अर्थाने धार्मिक आणि पवित्र वर्तुळात नजरे समोरून पुनीत बालन यांच्या कार्याचा चित्रपट भरकन डोळ्यासमोरून जातो. तेव्हा पुणे पुनीत झाल्याचे वाटते. बालन यांचे पुनीत कार्य या सोहळ्यासोबत समाजाला आणि भावी पिढीला दिशादर्शक आहे. पैसा संपत्ती असताना वाम मार्गाला गेलेल्या पिढीला पुनीत बालन आपल्या तत्वनिष्ठ कार्याचा परीचय नेहमीच करून देत असतात. या कार्यातून काहींनी बोध घेतला आणि त्यांच्या कार्यावर चालण्याचा प्रयत्न केला तर पुनीत यांचे सर्व कार्य सफल होईल. हीच बाप्पाला आणि निसर्गाला देखील आशा आहे.**

नक्कीच गणपती बाप्पा त्यांना भरभरून आशीर्वाद देतील यात काही शंकाच नाही पुनीत बालन हे आता शैक्षणिक क्षेत्रात सुद्धा मोठे काम करत आहेत या क्षेत्रात त्यांनी देशभरात सर्वात कठीण भागात म्हणजेच जम्मू काश्मीर खोऱ्यातील पहेलगाम, अनंत नाग, उरी, बारामुल्ला, सोफिया अशा अनेक भागांमध्ये त्यांनी मुलांसाठी शाळा उभारल्या आहेत हे करत असताना त्यांनी सामाजिक धार्मिक क्रीडा क्षेत्रात मोठे काम केले आहे पोलीस दलासाठी व भारतीय सैन्यासाठी त्यांचे मोठे योगदान आहे सामाजिक काम करत असतानाच त्यांनी या माध्यमातून समाजाप्रती त्यांनी एक मोठा आदर्श निर्माण केला आहे आपण त्यांच्याविषयी कितीही बोललो तरी ते कमीच पडेल असे आहेत पुण्यातील लाडके व्यक्तिमत्व. बालपणापासूनच पुनीत बालन यांना शिक्षणाची आवड होती त्यांचे प्राथमिक शिक्षण पुण्यातील विखे पाटील हायस्कूल मध्ये झाले व त्यानंतर त्यांनी कॉलेज जीवनासाठी मराठवाडा मित्र मंडळ हे कॉलेज निवडले या कॉलेजमधून त्यांनी बीकॉम पर्यंत शिक्षण घेऊन पदवी प्राप्त केली हे करत असतानाच त्यांनी अगदी कमी वयात म्हणजे वय वर्ष १६ या वयात त्यांनी व्यवसायाला सुरुवात केली हे करण्या अगोदर दोन वर्षे त्यांनी नोकरी देखील केली पण त्यांना नोकरीत फारसा रस नव्हता म्हणून त्यांनी सोळाव्या वर्षी व्यवसायात उडी घेतली व आपल्या वडिलांबरोबर व्यवसाय चालू केला पुणे बालक यांची आई एक आदर्श शिक्षिका होती व आजोबा लष्करात कर्नल या पदावर होते एक वेळ अशी आली होती की आजोबा लष्करात असल्यामुळे मनोमनी त्यांची सुद्धा लष्करात जाण्याची इच्छा होती लष्करात भरती होऊन देशसेवा करावी अशी त्यांची अगदी मनापासून इच्छा होती पण काही कारणास्तव ते व्यवसायाकडे वळले परंतु व्यवसायात जम बसत असतानाच त्यांनी देश सेवा करण्याचे व्रत घेतले होते ते त्यांनी सोडले नाही अनेक माध्यमातून ते देशसेवा करत आहेत भारतातील लष्कराच्या पाच कमांडसाठी ते आज उत्तमरीत्या काम करत आहेत भारतीय

## पुनीत बालन व न्यायनिष्ठा

भारतीय लष्कराच्या सहाय्याने पुनीत बालन यांनी 'इंद्राणी बालन फाउंडेशन'ने काश्मीर खोऱ्यातील संवेदनशील भागात शाळा सुरू केली आहे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सुरू केलेल्या या उपक्रमाबद्दल पुनीत बालन सांगतात काश्मीर खोऱ्यात भारतीय लष्कराकडून गेल्या अनेक वर्षापासून, आर्मी सद्भावना मिशन, अंतर्गत आर्मी गुडविल स्कूल या नावाने काही शाळा चालविल्या जातात काश्मीर खोऱ्यात योग्य प्रकारचे शिक्षण दिले जावे तेथील विद्यार्थी वाईट मार्गाला लागू नयेत, असा लष्कराचा हेतू आहे. या उपक्रमासाठी इंद्राणी बालन फाउंडेशनने भारतीय लष्कराशी करार केलेला असून शाळांच्या माध्यमातून काश्मीर खोऱ्यात सर्वांगीण विकास करणारे शिक्षण पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. या उपक्रमासाठी १५ चिनार कोअर, या तुकडीचे सहकारी लाभले आहे सर्वाधिक दहशतवादी कारवाया होणाऱ्या थंगधर, उरी, बारा मुल्ला, कुपवाड, अनंतनाग, शोपीयान, पहलगाम, त्रेगाम इत्यादी भागात या शाळा चालविल्या जातात. उरी शाळेत आज ५३५ विद्यार्थी शिकत असल्याचा आपल्याला अभिमान आहे व गर्व आहे.





लष्करासाठी देवाने मला काम करण्याची संधी दिली हे मी माझे भाग्य समजतो, लष्करा समावेत नवीन काश्मीर उदयास आणण्यासाठी मला जे काही करण्याची संधी मिळेल ते मी निश्चित करीन व संधीचे सोने करून दाखवीन भारतीय सैन्यासाठी काम करत असताना त्यांना गुणवान प्रशस्तीपत्रक मिळाले आहे या प्रशस्तीपत्रकामुळे माझे मनोबल दृढ निश्चय वाढविणारे आहे आणि मला जास्तीत जास्त देश सेवा करण्याची संधी मिळो ही मी बाप्पा जवळ प्रार्थना करत असतो असे पुनीत बालन ग्रुपचे व पुण्यातील पहिल्या श्रीमंत भाऊ रंगारी ग्रुपचे सर्वेसर्वा उत्सव प्रमुख श्री पुनीत बालन यांनी सांगितले.

## समाजात राहून समाजाप्रती महान कार्य करणारे असे हे आगळे वेगळे व्यक्तिमत्व पुनीत बालन

पुनीत बालन हे असे व्यक्तिमत्व आहे की ते समाजाला काय पाहिजे आणि काय नको याची त्यांना उत्तम पारख आहे त्यांनी आत्ताच यंदाच्या वर्षी त्यांच्या मंडळासाठी एक धाडसी निर्णय घेतला विषय होता दहीहंडीचा पुण्यामध्ये हा उत्सव खूप मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो ठिकठिकाणी मंडळांन कडून दहीहंडी उभारली जाते या उत्सवाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी स्पीकरच्या भिंतीच्या भिंती उभारल्या जातात व त्याच्याच तालावर सर्व तरुणाई नाचत व थीरकत असते परंतु या आवाजाचा तरुणांना जेवढा आनंद होत असतो त्याच्या दुप्पट त्याचा त्रास ज्येष्ठ नागरिकांना खूप होत असतो त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांचे त्यांचे सामान्य जनजीवन विस्कळीत होते याच गोष्टीचा धागा पकडून पुनीत बालन यांनी त्यांच्या मंडळाची यंदाची दहीहंडी उत्सव एकदम साध्या व विना ध्वनी वर्धकाशिवाय साजरी केली याच गोष्टीमुळे पुण्यातील काही राजकीय व्यक्तींनी नाराजी व्यक्त केली होती परंतु पुनीत बालन यांनी त्या नाराजीचा जास्त विचार न करता ज्येष्ठ नागरिकांना ध्वनीवर्धकाचा त्रास झाला नाही याचा खुलेआम पणे आनंद व्यक्त केला तसेच शहरातील ज्येष्ठ नागरिकांचे यावरील मत काय आहे हे जाणून घेण्याचा जास्त विचार केला तसेच ज्येष्ठ नागरिकांनी सुद्धा पुनीत बालन यांना प्रत्यक्ष भेटून धन्यवाद व आशीर्वाद दिले व पुढील वर्षापासून सर्वच मंडळांनी अशा प्रकारे सण साजरे करावेत असे निवेदन पुनीत बालन यांच्याकडे सुपूर्द केले ज्येष्ठ नागरिकांच्या अशा आशीर्वादामुळे पुनीत बालन यांनी खूपच आनंद व्यक्त केला व आपण दिलेले निवेदन सरकार पर्यंत पोहोचवू असे जेष्ठ नागरिकांना आश्वासन दिले



## बाहुबली पुनीत बालन

पुनीत बालन हे प्रसिद्ध मराठी उद्योजक आहेत ते पुण्यात अनेक व्यवसाय करतात ज्यात पुनीत बालन ग्रुप, अप्पा सिमेंट, आणि रंगा ग्रुपचा समावेश आहे ते बाहुबली म्हणून ओळखले जातात कारण त्यांनी अनेक क्षेत्रात यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक मिळवला आहे पुनीत बालन सामाजिक कार्यासाठी ही ओळखले जातात आणि त्यांनी अनेक गरजू लोकांना मदत केली आहे. त्यांचे श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांच्यासोबतचे संबंध विशेष आहेत.





# ॲसिडिटी टाळण्यासाठी आहार बदला

आपल्याला बद्धकोष्टता, उलटी, कोरडा खोकला, घशात व पोटात जळजळ, पशात खवखव वा सूज इ. व यातील एकापेक्षा जास्त लक्षणे असतील तर आपल्याला ॲसिडिटी होऊ शकते. ही समस्या टाळण्यासाठी आपल्याला आपल्या आहारात बदल करून काही पदार्थ घेण्याची व काही सोडण्याची गरज आहे.

**केळी आहेत अँटीडोट :** या फळाला ॲसिडिटीचा अँटीडोट म्हणतात. यामध्ये असलेल्या पोटॅशियममुळे पोटाच्या आतील भिंतींवर म्यूकसचा थर तयार होतो. जो ॲसिडने होणाऱ्या पोटाच्या नुकसानीपासून वाचवतो. व शरीराचा पीएच स्तर कमी करतो. केळीत उत्तम प्रमाणात फायबरही असते जे पोट व्यवस्थित ठेवते.

**शहाळे देईल आराम :** हे पेय शरीरातील विषाक्त पदार्थ बाहेर काढते व पोट आतून थंड राखण्याचे काम करते. थंड दूध गुणकारी स्वत:ला ॲसिडिटीपासून दूर ठेवण्यात दूधही आपली मदत करू शकते. पण या कामासाठी थंड घ्यायला हवे. हे पोटातील ॲसिड शोषते व इ्‌ दूध जळजळीपासून मुक्ती देते. जेव्हा ॲसिडिटी वा छातीत जळजळ होत असेल तेव्हा चटक एक ग्लास थंड दूध काहीही न मिसळता प्यावे.

**मठ्ठा व दही उत्तम :** हे दोन्ही खाण्याची चव तर वाढवतातच शिवाय पोटाच्या समस्येवरही रामबाण आहेत. यांच्यामधील उत्तम बॅक्टेरिया म्हणजेच प्रोबायोटिक्स ॲसिडिटीपासून वाचवतात. एवढेच नव्हे तर रोज दही वा मठ्ठा घेतल्यास ही समस्या मुळापासून नष्ट होते.

**आले :** आल्यामध्ये नैसर्गिक रुपात ॲसिड संपवण्याचा गुण असतो. आले खाऊनही आपण ॲसिडिटीच्या समस्येवर नियंत्रण मिळवू शकता.

**पाने :** तुळस, कढीपत्ता, पुदिना, कोथिंबीर वाचवतील. तुळशीची पाने गारवा देतील. इ. आपल्या जेवणात घ्या. हे ॲसिडिटीपासून यामध्ये अँटीऑक्सिडेंटही भरपूर प्रमाणात बाहेर काढतात. कढीपत्त्यात बीटाकेरोटीन आढळतात. तसेच शरीरातील विषाक्त पदार्थ असते जे आपल्या त्वचेसाठी उत्तम असते तसेच यातील अँटीऑक्सिडेंट ॲसिडिटी होऊ देत नाहीत. कढीपत्त्यात पोटाची जळजळ शमवण्याचाही गुण असतो. कढीपत्त्यात व्हिटॅमिन ए सुद्धा असते. ग्रीन टी मधील अँटीऑक्सिडेंट गॅसपासून आराम देतात.

**गरम भाज्या टाळा:** बीट, मुळा लसूण, कै-या या गरम भाज्या असतात ज्या ॲसिड तयार करण्याचे काम करतात. विशेषत: ॲसिडिटी सतावत असेल तेव्हा या भाज्या खाणे पूर्णपणे टाळा.

### हेही माहीत असू या

ॲसिडिटी जाणवल्यास बिगरकैफिनचा हर्बल टी फायदेशीर राहील.

लोफॅ ट मिल्क, कोकोनट मिल्क, स्मूदी, पाणी, काजू मिल्क, आल्मंड मिल्क व सोया मिल्क इ. ही आराम देतील,

ॲसिडिटी झाल्यास सफरचंदाचा ज्यूस पिऊ नये. तो नुकसान करील.

ओदूस शरीरातील ॲसिड शोषण्याचे काम करते. ॲसिडिटीची समस्या टाळण्यासाठी याचा आहारात समावेश करावा.

रेड मीट टाळावे. आपली नॉनव्हेज डीश रास्ट वा ग्रिल्ड असणे उपयुक्त असेल.

अंड्यातील पिवळा भाग खाणे टाळावे. तीळाचे तेल, जवसाचे तेल, सूर्यफूल तेल व अक्रोड इ. ट्रान्स फॅट कमी करण्याचे काम करतात. या खराब फॅटमुळे ॲसिडिटी होत असते.



# साखर खाणे बंद करण्याचे फायदे

### वारंवार खाण्याची इच्छा कमी होईल

लॅप्टिन एक महत्त्वाचे हार्मोन आहे. जे शरीराला सांगते की केव्हा खायला हवे. शुगर नियंत्रित केल्यास लॅप्टिन कार्यप्रणाली सुधारू शकते आणि यात सर्वांत आवश्यक पाऊल आहे जादा साखर कमी करणे.

### आपली त्वचा सुधारू लागते

जास्त साखर खाल्ल्यामुळे शरीरात (अॅडव्हान्स्ड ग्लायकेशन अँड प्रॉडक्ट्स) नावाचा घटक तयार होतो जो त्वचेला लवकर वृद्ध करण्याचे काम करतो.

जर साखर कमी केली आणि आपली शुगर सामान्य ठेवली तर ही प्रक्रिया संथ होते. विशेषत: जर आहारात फळे आणि भाज्या सामील करीत असाल तर हे त्वचेसाठी फायदेशीर आहे.

### डिप्रेशनचा धोका कमी होईल

साखर कमी केल्यास मानसिक आरोग्यही उत्तम होऊ शकते. शोध सांगतात की, जास्त साखर खाल्ल्यामुळे डिप्रेशन, चिंता आणि इतर मानसिक समस्यांचा धोका वाढू शकतो. वैज्ञानिकांच्या मते ही समस्या साखरेच्यो उच्च ग्लायसेमिक इंडेक्समुहे मेंदूत होणा?्या सुजेशी संबंधित असू शकतो.

### आपले वजन कमी होऊ लागेल

जर आपण आपल्या डाएटमधून जादा साखर हटवाल तर आपल्या एकूण कॅलरीचे प्रमाण कमी होते. यामुळे वजन कमी करणे आणि ते टिकवून ठेवणे सोपे होऊ शकते.

शोध सांगतात की, जास्त साखर खाणे स्थूलता व वजन वाढण्याचे एक मोठे कारण आहे.



## तंदुरुस्त शरीरासाठी

- सकाळी लवकर उठा. किमान अर्धा तास व्यायाम करा. त्यामुळे तुमची शारिरिक क्षमता सुधारेल आणि शरीर प्रमाणबद्ध दिसू लागेल.
- रिकाम्या पोटी कधीही गरम पेये पिऊ नका. त्यामुळे पोटात वात धरण्याची शक्यता असते. त्याऐवजी कोमट पाण्यात लिंबू पिळून प्या. त्यामुळे शौचाचा मार्ग मोकळा होईल.
- सकाळी न्याहरीमध्ये शेंगदाणे आणि ड्रायफ्रूटचा समावेश करा. त्यामुळे दिवसभर शरीराला पौष्टिक घटक मिळतील.
- वर्तमानपत्रे, पुस्तके आणि विविध लेखकांचे ब्लॉग वाचा. त्यातून तुमचा शब्दसंग्रह वाढेल.
- तुम्ही दिवसभर काय केले याचा रात्री झोपण्यापूर्वी आढावा घ्या. त्यातून कुठल्या गोष्टींमध्ये सुधारणा करायची याची नोंद करा. ही चांगली सवय तुमच्यामध्ये अनेक चांगल्या सवयी निर्माण करेल.



# वैताग टाळाल, तर राग येणार नाही

जीवनात बऱ्याचदा आपल्या आवडीचे काम नसेल व समोरच्याला आपण काही सांगू शकत नसतो तेव्हा स्वत:ला चिडचिडे बनवून घेतो. रागाच्या भरात माणूस काहीही व्यक्त करतो, पण चिडचिडीत तो राग स्वत:त नेऊन नवे रूप देतो आणि स्वत:लाच दुखावतो.

यासाठी मनपसंत काम नसेल, तर सर्वप्रथम चीड येणार नाही हे धैर्य बाळगावे. जेव्हा एखादा चिडचिडा होतो तेव्हा मूळ वस्तूंशी लढू लागतो. रागीट माणूस चैतन्याशी लढतो, पण चिडचिडा मुळाला भिडतो. काही लोक अचानक पेन फेकून देतात, वा काही गेट जोरात बंद करतात.

कोणी कपडे फाडतो, तर कोणी भांडीच फेकतो. जेव्हा मनपसंत गोष्ट वा काम नसेल, तर आतून एक वैताग येतो. तो वैताग उडवून टाका.

जेव्हा पिंजरा उघडून आतील पक्ष्याला बाहेर काढण्याचा प्रयत्न केल्यास तो घाबरतो व फडफड करू लागतो. पण, जर आपण हाताने पकडून त्याला उडवले, तर चटकन उडून जातो. माणसाच्या मनातील वैतागही असाच असतो. जोपर्यंत तो बाहेर काढणार नाही, तोपर्यंत तो बाहेर न पडता फडफडत राहील. पण, एकदा मोकळेपणाने तो उडवला, तर तो वैताग उडून जाईल व चिडचिड होण्याची शक्यता नाहीशी होईल. तेव्हा आपण रागापासून दूर राहाल व आवडते काम नसूनही हे मानून घ्याल की जे होते ते चांगलेच होते.



# डाव्या कुशीवर झोपण्याचे फायदे

**डाव्या कुशीवर झोपल्यामुळे आपल्या हृदयावर दबाव जाणवत नसल्याने हृदय योग्य पद्धतीने काम करतं. यामुळे हृदयाचे आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते.**

डाव्या कुशीवर झोपल्यामुळे शरीरातील विभिन्न अंग आणि मेंदूपर्यंत रक्तात ऑक्सिजनचा प्रवाह सुरळीत होतो. याने शरीराचे सर्व अंग निरोगी राहतात आणि चांगल्या प्रकारे कार्य करतात.

डाव्या कुशीवर झोपल्यामुळे गर्भवती स्त्रियांसाठी डाव्या कुशीवर झोपणे योग्य आहे कारण याने गर्भात वाढत असलेल्या बाळाच्या प्रकृतीवर विपरित परिणाम होत नाही.

या व्यतिरिक्त टाचा, हात आणि पायामध्ये सूज येण्याची समस्या दूर होते. डाव्या कुशीवर झोपल्यामुळे रक्त प्रवाह सुरळीत होत असल्याने झोप पूर्ण होते. या स्थितीत झोपून उठल्यावर थकवा जाणवत नाही आणि पोटासंबंधी समस्याही दूर होतात. पचन क्रिया सुरळीत होते आणि पाचक प्रणालीवर अतिरिक्त दबाव येत नाही, डाव्या बाजूकडे झोपल्याने शरीरात जमा होत असलेले टॉक्सिन लम्प्रिका वाहिनी तंत्राद्वारे बाहेर पडतात.

# सप्टेंबरमध्ये जन्मलेल्यांसाठी नीलम लाभदायक

शनी ही शिस्तप्रिय व गरिबांना न्याय मिळवून देणारी देवता आहे. नीलम हे शनीचे रत्न असून, ज्याला ते सूट होते त्याला राजा बनवते, तर ज्याला सूट होत नाही त्याला रंक बनवते. ज्यांची रास मकर, कुंभ, वृषभ व तूळ असेल त्यांनी नीलम धारण करावे, तसेच सप्टेंबर महिन्यात जन्म झालेल्या व्यक्तींनीही नीलम धारण केल्यास फायदा होतो.

याउलट ज्यांचे सिंह लग्न, मेष लग्न, वृश्चिक लग्न असेल त्या जातकांनी नीलम धारण करू नये, अन्यथा त्यांचे नुकसान होते. शनी जर ६, ८, १२ या अनिष्ट स्थानात असेल, तर नीलेम धारण केल्यामुळे अचानक समस्या उत्पन्न होतात. शनीचे शत्रू असलेल्या रवी व मंगळ या ग्रहांच्या माणिक व पोवळे या स्त्रांसोबत नीलम कधीही धारण करू नये.

नीलमचा प्रभाव स्नायूतंत्राद्वारे असतो. या संबंधित काही त्रास असेल, तर नीलम रत्न धारण केल्यास फायदा होईल. लकवा, हाडांमध्ये वेदना, दातांचा त्रास व दमा असल्यास नीलम धारण केल्यामुळे अत्यंत फायदा होतो, तसेच ज्यांना कंबरदुखी, डोकेदुखी, कॅन्सर इ. पैकी व्याधी असेल त्यांनी नीलम धारण केल्यास लाभ होतो.

ज्यांना रात्री भीती वाटत असेल त्यांनीही नीलम धारण करणे फायदेशीर असते.

वृषभ व तूळ लग्नाच्या जातकांनी नीलम धारण केल्यास त्यांच्या भाग्याचे तारे चमकू लागतील. मकर व कुंभ लग्न असणाऱ्यांसाठीही नीलम प्रगतीची दारे उघडतो. नीलम धारण केल्यामुळे मनात गहन विचार येतात व मन शांत राहते. ज्यांना प्रत्येक गोष्टीत घाई असते त्यांनी नीलम धारण केल्यास ते धैर्यवान होतील.

## महत्त्वाच्या काही गोष्टी

चेहरा, डोळे गरम पाण्याने धुणे हानिकारक असते. खूप थंडी असली तरी हे धुण्यासाठी थंड पाण्याचाच वापर करायला हवा.

जर आपण आठवड्यातील सहा दिवस ठरावीक वेळी संतुलित प्रमाणात आहार घेत असाल, तर सातव्या दिवशी मनपसंत पदार्थ खाऊ शकता व ते पचवूही शकता. याउलट आपण सहा दिवस कोणतेही पथ्य न पाळता स्वच्छंदीपणे खात-पित असाल, तर रविवारी उपवास करून फक्त फळे व दूधच घ्यायला हवे.

## थायरॉईडवर काही घरगुती उपचार

### उपाय १

### उपाशी पोटी

१ चमचा जवस पावडर दिवसातून ३ वेळा
१ चमचा धणे पावडर १ वेळा
१ एक चमचा बडीशोप १वेळा
पावडर न करता खाऊ शकता किंवा कोमट पाण्यासोबत पावडर करुन घेऊ शकता सकाळी रोज ३ महिने उपाशी पोटी खायची.

### उपाय २

सकाळी अंघोळ करताना तोंडात कोमट पाणी पुर्ण भरुन घ्या व अंघोळ होई पर्यंत तसेच पाणी ठेवा त्यांने थायरॉईड ग्रंथी ॲक्टिव होऊन सुरळीत काम करतात.

### उपाय ३

अनुलोम विलोम प्राणायाम ७ मिनिटे
उज्जायी प्राणायाम १० मिनीटे
कपालभाती १० मिनिटे
रोज सकाळी संध्याकाळी हे प्राणायाम करा.

### उपाय ४

वजन वाढले असेल तर भोपळ्याचे (लौकी) ज्युस प्यावे.
एक ग्लास कोमट पाणी २० मिली कोरफड ज्युस त्यात १० तुळशीचा रस टाका.

### उपाय ५

दररोज तांब्याच्या भांड्यातीलच पाणी प्यायचे.

### उपाय ६

नारळाच्या झाडाच्या ४ मुळ्या पेनच्या आकाराच्या घेऊन याचा काढा बनवुन रोज संध्याकाळी २१ दिवस प्यायचे.

### उपाय ७

रात्री ब्रश करुन झोपा सकाळी उठल्याबरोबर आपल्या लाळेने थायराइड ग्रंथीला स्पर्श करुन सावकाश १० १२ वेळा चोकायचं आहे.

# वास्तुदोष निवारणाचे काही नियम





आपण जेव्हा पाणी प्याल, तेव्हा आपले तोंड ईशान्य दिशेला ठेवावे. जेवताना ताट आग्नेय दिशेला ठेवावे व पूर्वेकडे तोंड करून जेवावे.

झोपताना नैऋत्य कोपऱ्यात झोपावे व डोके दक्षिणेकडे करून झोपावे. यामुळे गाढ व उत्तम झोप लागते.

पूजा करताना आपले तोंड ईशान्य वा वायव्य दिशेला करावे.

प्रगतीसाठी लक्ष्मी, गणेश, कुबेर, स्वस्तिक, मीन इ. चिन्हे मुख्य दारावर असावीत.

दक्षिण-पश्चिमेला जास्त दारे असल्यास ती बंद करून त्यांची संख्या कमी करावी.

किचन चुकीच्या ठिकाणी असल्यास आग्नेय कोपऱ्यात एक बल्ब लावून तो सकाळी-संध्याकाळी प्रज्वलित करावा.

दुकानाच्या प्रवेशदाराच्या दोन्ही बाजूंना श्रीगणेशाची मूर्ती वा चित्र वा स्टीकर लावावे. एका गणेशाची दृष्टी दुकानात, तर दुसऱ्या गणेशाची दृष्टी बाहेर असावी. यामुळे दुकानात शुभत्व वाढते. घरातील सर्व प्रकारचे वास्तुदोष नष्ट करण्यासाठी मुख्य दाराच्या एका बाजूला केळीचे झाड, तर दुसया बाजूला तुळशीचे रोप कुंडीत लावावे.



## घरात पिरॅमिड ठेवण्याचे काही फायदे

- जर शत्रुबाधेने त्रस्त असाल तर दक्षिणेला पिरॅमिड ठेवावे.
- जर यश-कीर्ती हवी असेल तर घरात पूर्वेला पिरॅमिड ठेवावे.
- जर एखाद्याचे मन अभ्यासात लागत नसेल तर पिरॅमिड ठेवावे. यामुळे अभ्यास करताना मन एकाग्र होते.
- जर कुटुंबात एखाद्याला वाईट सवयी लागल्या असतील तर पिरॅमिड ठेवल्यामुळे फायदा होतो.
- पचनशक्ती योग्य राहात नसेल तर पाणी पिण्यापूर्वी त्यावर पिरॅमिड ठेवावे. यामुळे पचनशक्ती वाढते.



बायको नवऱ्यासाठी सकाळी गरम दूध घेऊन येते. नवरा ग्लास घेऊन तोंडाला लावतो आणि एक घोट घेतो

**नवरा :** याक छी ! हे कसलं गं दूध ?

**बायको :** ते काय आहे ना, केसर संपलं आहे म्हणून मी तुमच्या खिशातील विमल पान मसाला टाकला.

ते टीव्हीवर म्हणतात ना इसके दाने दाने मे है केसर का दम (नवऱ्याने विमल सोडली).

---

**पती :** तू आणि फक्त तूच या घराला स्वर्ग बनवू शकतेस ?

**पत्नी :** कसं काय ?

**पती :** माहेरी जाऊन!!

एकटयाने ट्रिपला जाण्यासाठी खिशात पैसे असणे जितके गरजेचे असते, त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक गरजेचे असते ते तुमच्यात आत्मविश्वास असणे.



# एकट्याने ट्रिपला जाताना काय करावे...

विसरू नका, आत्मविश्वास निशस्त्राकडील शस्त्र आहे. लोकांशी पूर्ण आत्मविश्वासाने बोला.

स्वत: सोबत मौल्यवान गोष्टी घेऊन जाण्याची चूक करू नका. सोबत जे काही घेऊन जाल त्यावर लक्ष ठेवा.

आजूबाजूला काय सुरू आहे, तुमच्यावर कोणी नजर ठेवून तर नाही ना, यावर लक्ष ठेवा.

तुम्ही एकट्या आहात, एकाकीपणा जाणवत असेल तरी तो इतरांना दाखवून देऊ नका.

तुम्ही कुठे थांबला आहात, कोणासोबत आहात, येथून कुठे जाणार आहात इत्यादी माहिती कोणाशीही शेअर करू नका,

सर्वांपासून वेगळे राहण्याची चूक करू नका. लोकांशी गप्पा मारा, पण मर्यादा सांभाळून.

सोशल मिडियाद्वारे आप्तांच्या संपर्कात राहा, कारण एखादे संकट आल्यास तुम्ही त्यांची मदत घेऊ शकाल.

कोणावरही पटकन विश्वास ठेवण्याची चूक तुम्हाला संकटात टाकू शकते.

पासपोर्ट, क्रेडिट कार्ड, एटीएम कार्ड, पॅन कार्ड इत्यादी महत्त्वपूर्ण दस्तऐवजाची झेरॉक्स स्वत:सोबत नक्की ठेवा.

साधे, सौम्य, सभ्य कपडे घाला. खूप जास्त तोकडे कपडे घालू नका.

रात्री फिरायला जाणे टाळा. शक्यतो सकाळीच फिरून घ्या.

जिथे जाणार आहात तेथील स्थानिक भाषेतील काही शब्द, शिकून घ्या. जसे थैंक्स, सॉरी, हेल्प इत्यादी.

निश्चित आणि सुरक्षित सहलीला जाण्यापूर्वी ट्रॅव्हल इन्शुरन्स नक्की काढा.



# गणेश चतुर्थी २०२५

**गणेश चतुर्थी २०२५ हा पवित्र सण भारतात साजरा केला जाणारा सर्वात महत्वाचा सण आहे. गणेश चतुर्थीला विनायक चतुर्थी आणि गणेश उत्सव म्हणूनही ओळखले जाते.**
**हिंदू कॅलेंडरनुसार, गणेश चतुर्थीचा पवित्र सण भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या चतुर्थी तिथीला साजरा केला जातो. गणेश चतुर्थीचा हा उत्सव पूर्ण ११ दिवस चालतो. ज्यामध्ये गणेशजींना १० दिवस घरात ठेवले जाते. आणि त्याची चांगली सेवा आणि पूजा केली जाते आणि ११ व्या दिवशी गणेशाचे मिरवणूक काढून विसर्जन केले जाते.**

शास्त्रांमध्ये, भगवान गणेशाचे वर्णन प्रथम देवता म्हणून केले आहे. हिंदू धर्मग्रंथांमध्ये असे म्हटले आहे की कोणतेही काम सुरू करण्यापूर्वी गणपतीची पूजा केल्याने भक्ताला विशेष लाभ मिळतो. जर तुम्ही कोणत्याही पूजेसाठी पंडित शोधत असाल, मग तो कोणत्याही अवस्थेत असो, तर आज आम्ही तुमचा शोध येथे संपवत आहोत. ९९ पंडित हे सर्वोत्तम व्यासपीठ आहे जे तुम्हाला प्रत्येक प्रकारच्या पूजेसाठी आणि वेगवेगळ्या भाषांमध्ये अनुभवी पंडित प्रदान करेल.

जर तुम्ही उल्लेखित शुभ मुहूर्तावर गणेशमूर्तीची स्थापना केली आणि त्यांची पूजा केली तर गणेश तुमचे सर्व दुःख आणि संकटे दूर करेल आणि त्यांचे आशीर्वाद तुमच्यावर नेहमीच राहतील. गणेश चतुर्थी हा हिंदूंचा एक प्रमुख सण आहे. हा एक दिवसाचा उत्सव आहे जो भगवान गणेशाच्या वाढदिवसानिमित्त साजरा केला जातो. गणेशाला बुद्धीचा दाता म्हणूनही ओळखले जाते.

कोणताही समारंभ, विधी किंवा पूजा सुरू करण्यापूर्वी, भगवान गणेशाची पूजा केली जाते कारण त्यांचा उल्लेख शास्त्रांमध्ये प्रथम देवता म्हणून केला आहे. भगवान गणेशाला १०८ वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते पण त्यांची सर्वात प्रिय नावे गणपती आणि विनायक आहेत. गणेश चतुर्थीच्या पूजेची तयारी एक महिना आधीच सुरू होते. हा उत्सव सुमारे दहा दिवस चालतो. ज्यामध्ये गणपतीची मातीची मूर्ती घरी आणली जाते.

घर फुलांनी सजवले आहे. भाविक मोठ्या संख्येने मंदिरांना भेट देतात. ज्या घरांमध्ये मूर्तीची स्थापना केली जाते, तिथे पंडाल तयार केला जातो आणि गणपतीला प्रसन्न करण्यासाठी भजन आणि कीर्तन केले जाते.

गणेश चतुर्थीच्या शेवटच्या दिवशी जेव्हा गणेश विसर्जनासाठी नेले जाते. मग सर्व लोक त्यांच्या मागे गाणे आणि नाचत जातात आणि उत्सवाबद्दलचा त्यांचा उत्साह दाखवतात.

या दिवशी, भारतभर सर्वत्र तरुणांकडून मोठ्या संख्येने मिरवणुका काढल्या जातात. शेवटी गणपतीचे नदी किंवा समुद्रात विसर्जन केले जाते.

लोक मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने मिरवणुकीत सामील होतात आणि त्यांचे सर्व त्रास दूर करण्यासाठी देवाला प्रार्थना करतात. या दिवशी भाविक मोठ्या संख्येने देवावरचा आनंद आणि श्रद्धा व्यक्त करण्यासाठी येतात.

**गणेश चतुर्थी २०२५ ची पूर्ण पूजा पद्धत**

गणेश चतुर्थीच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करावे, गणपतीचे ध्यान करावे आणि उपवास करण्याची प्रतिज्ञा घ्यावी.

यानंतर, गणेशाची मूर्ती लाल रंगाच्या कापडावर ठेवा. नंतर गंगाजल शिंपडताना गणपतीची प्रार्थना करा. सुपारीच्या पानावर थोडे तूप आणि सिंदूर मिसळून स्वस्तिक चिन्ह बनवा आणि त्याच्या मध्यभागी कलाव्याने पूर्णपणे गुंडाळलेली सुपारी ठेवा. भगवान गणेश महाराजांना फुले, सिंदूर आणि पवित्र धागा अर्पण करा. यानंतर, गणपतीला प्रसाद अर्पण करा. गणपतीला त्यांचा आवडता मोदक अर्पण करा. मंत्रांचा जप करून गणपतीची पूजा करा. गणेश जी व्रत कथा ऐका आणि गणेश चालिसाचे पठण करा. रात्री चंद्र पाहण्यापूर्वी गणपतीची पूजा करा. पूजा पूर्ण झाल्यानंतर, सर्वांना प्रसाद वाटून द्या. त्यानंतर, चंद्र पाहिल्यानंतरच उपवास सोडा आणि जेवण करा. गणपती स्थापनेच्या वेळी लक्षात घेण्यासारख्या गोष्टी गणेश चतुर्थीला गणपतीची पूजा करण्यासाठी, गणपतीची मूर्ती असणे आवश्यक आहे, म्हणून या दिवशी गणपतीची नवीन मूर्ती खरेदी करा. लक्षात ठेवण्याची मुख्य गोष्ट म्हणजे तुम्ही कोणतीही मूर्ती आणत असाल, तिची खोड उजव्या बाजूला असावी.

या दिवशी गणेशपूजन फक्त गणपतीच्या मूर्तीनेच केले जाते परंतु जर काही परिस्थितीमुळे तुम्ही मूर्ती आणू शकत नसाल तर तुम्ही गणपतीच्या जागी सुपारी ठेवू शकता. कारण सुपारी हे गणपतीचे एक रूप मानले जाते, म्हणूनच गणपतीच्या पूजेमध्ये सुपारी नक्कीच अर्पण केली जाते.

जेव्हा तुम्ही गणेशजींना घरी आणता तेव्हा शंख वाजवून त्यांचे घरात स्वागत करा आणि घर शुद्ध करण्यासाठी गंगाजल संपूर्ण घरात शिंपडा. यानंतर, गणपतीला बसवण्यासाठी स्टूलवर लाल कापड पसरवा. नंतर गंगाजलात दुर्वा आणि पान टाका आणि गणपतीला स्नान घाला.

गणपतीला स्नान घालल्यानंतर त्यांना पिवळे कपडे घाला आणि कुंकू आणि तांदळाच्या दाण्यांचा तिलक लावा. हे सर्व काम पूर्ण केल्यानंतर, भगवान गणेशाचे ध्यान करा. ॐ गं गणपतये नमः मंत्राचा २१ वेळा जप करा.

पूजा करताना, गणपतीच्या मूर्तीजवळ पाण्याने भरलेले तांब्याचे भांडे ठेवा. कलशाखाली थोडे तांदूळही ठेवा. तांब्याच्या भांड्यावर लाल रंगाचा धागा बांधा. यामुळे घरात नेहमीच सुख आणि समृद्धी राहील.

अशा प्रकारे भगवान गणेशाची पूजा पूर्ण केल्याने तुम्हाला त्यांचे आशीर्वाद मिळतात आणि भगवान गणेश, ज्यांना विघ्नहर्ता असेही म्हणतात, तुमचे सर्व त्रास दूर करतात.

गणेश चतुर्थी २०२५ चा सण देशभर साजरा केला जातो आणि सर्व ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे साजरा केला जातो परंतु सर्वांचा सार एकच आहे जो लोकांना त्यांच्या सणांबद्दल उत्साहित आणि जागरूक करणे आहे.

गणेश चतुर्थीच्या दिवशी, गणपतीची मूर्ती घरांमध्ये किंवा वेगळ्या पंडालमध्ये स्थापित केली जाते. हा संपूर्ण उत्सव १० दिवस पर्यंत घडते.

या दहा दिवसांत, गणपतीची पूजा केली जाते आणि भजन आणि कीर्तन गायले जाते. या सर्वानंतर ११ वा दिवस मूर्ती पाण्यात विसर्जित केली जाते, ही प्रक्रिया गणेश विसर्जन असेही म्हटले जाते.

ज्या दिवशी भक्त गणेशाचे विसर्जन करतात. त्या दिवसाला अनंत चतुर्दशी म्हणतात. या दहा दिवसांत, गणपतीची खूप पूजा केली जाते आणि त्यांना मोदक आणि बेसनाचे लाडू यासारखे आवडते पदार्थ दिले जातात. त्यानंतर भक्तांमध्ये प्रसाद वाटला जातो.

गणेश चतुर्थीचे महत्त्व

भगवान गणेशाला बुद्धीची देवता मानले जाते. जो कोणी त्याच्या आशीर्वादाखाली असतो, त्याची बुद्धिमत्ता नेहमीच उच्च राहते आणि तो प्रत्येक क्षेत्रात प्रगती करतो.

गणेशजी महाराज मानवी बुद्धीला स्थिर ठेवण्याचे काम करतात. म्हणून, गणेश चतुर्थीला जो कोणी गणपतीची पूजा करतो, त्याला भगवान गणेश आपल्याला बुद्धी देतात.

महाभारत लिहिणारी व्यक्ती म्हणजे भगवान गणेश. महर्षी वेद व्यासांनी ही कथा भगवान गणेशाद्वारे सतत सांगून लिहून ठेवली.

गणेशजींनी ही कथा लिहिण्यासाठी एक अट ठेवली होती आणि ती म्हणजे ते जोपर्यंत सतत बोलत राहतील तोपर्यंतच ते ती लिहितील.

जर कोणत्याही कारणास्तव महर्षी मध्येच थांबले तर गणेशजी देखील त्याच क्षणी लिहिणे थांबवतील. एक प्रकारे, हे महर्षी वेद व्यासजींसाठी एक परीक्षा होती की त्यांना जे लिहिले जात आहे ते त्यांच्या अस्तित्वाशी जोडलेले आहे की ते स्वतःच्या बुद्धीने काहीतरी निर्माण करत आहेत.

पण वेद व्यासजी मध्येच थांबले नाहीत आणि गणेशजी मध्येच थांबले नाहीत. अशाप्रकारे, अनेक महिने वेद व्यास बोलत राहिले आणि गणेशजीही लिहित राहिले. भगवान गणेश हे मानवी बुद्धिमत्तेचे प्रतीक आहेत.

तुमच्या बुद्धिमत्तेचे स्वरूप असे आहे की तुम्ही जाणीवपूर्वक दृश्यमान करण्यासाठी तुमच्या बुद्धिमत्तेचा योग्य वापर करता.

त्यांना बुडवणे हे या वस्तुस्थितीचे प्रतीक आहे की जर तुम्ही तुमच्या बुद्धिमत्तेचा योग्य वापर केला तर आपण आपल्या ज्ञानाने या जगात स्वतःला बुडवू शकतो.

आणि जेव्हा तुम्ही तुमच्या कल्पनाशक्तीने जग जिंकता, तेव्हा तुमच्या कल्पनाशक्तीवर नियंत्रण ठेवणे ही मोठी समस्या राहणार नाही.

गणेश चतुर्थीचा इतिहास

गणेश चतुर्थीचा हा सण भगवान गणेशाचा वाढदिवस म्हणून साजरा केला जातो. भगवान गणेशाच्या जन्माबद्दल अनेक वेगवेगळ्या कथा आणि तथ्ये आहेत परंतु आज आपण सर्वात लोकप्रिय तथ्याबद्दल बोलू.

गणेशजी हे भगवान शिव आणि माता पार्वती यांचे पुत्र आहेत पण गणेशजींचे निर्माते आहेत आई पार्वती आहे. असे मानले जाते की देवी पार्वतीने तिच्या द्रवपदार्थांपासून भगवान गणेशाची निर्मिती केली.

एके दिवशी ती आंघोळीसाठी गेली तेव्हा तिने भगवान गणेशाला सांगितले की कोणालाही आत येऊ देऊ नका. त्याच क्षणी महादेव तिथे पोहोचले.

गणेशजींनी त्याला आत जाण्यापासून रोखले. जेव्हा गणेशजींनी सर्वांना समजावून सांगितल्यानंतरही त्यांनी ऐकले नाही, तेव्हा महादेव संतापले आणि त्यांनी त्रिशूलाने त्यांचे डोके कापले.

ही बातमी आई पार्वतीला कळताच ती खूप रागावली आणि तिने माता कालीचे रूप धारण केले. तिचा राग पाहून सगळे घाबरले. त्यानंतर महादेवाने गणेशाला पुनरुज्जीवित करण्याचे वचन दिले आणि त्याचे धड हत्तीच्या डोक्याशी जोडले. तेव्हापासून गणेशजींचे नाव गजानन ठेवण्यात आले. म्हणूनच, गणेश चतुर्थीचा पवित्र सण या दिवशी साजरा केला जातो.

# श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती बाप्पाची यावर्षी देखील अभिषेक सेवा



भारतातील पहिला सार्वजनिक गणपती असलेल्या श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती बाप्पाच्या श्री गणेश अभिषेक सेवेला गेल्या वर्षी मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे यावर्षी देखील हा उपक्रम सुरू ठेवण्यात येणार आहे भाविकांना ऐच्छिक देणगीच्या स्वरूपात तुन ही सेवा मिळणार असून यासाठी नाव नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे

## अभिषेकासाठी नाव नोंदणीला सुरुवात
## पहाटे ५ ते ११ या वेळेत अभिषेक करता येणार

गेल्या १३४ वर्षापासून श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीचा उत्सव होत आहे त्या निमित्ताने ट्रस्टकडून सामाजिक उपक्रम राबविले जातात मात्र उत्सवात श्री गणेशाची अभिषेक सेवा सुरू व्हावी अशी मागणी भाविकांकडून सातत्याने होत होती भाविकांच्या या मागणीचा मान राखत अखेर ट्रस्टने गेल्या वर्षीपासून अभिषेक सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला हीच परंपरा या वर्षी देखील पुढे सुरू ठेवण्यात येणार आहे ट्रस्ट तर्फे सागण्यात आले आहे की दहा दिवसांच्या उत्सव कालावधीत पहाटे पाच ते अकरा या वेळेत भाविकांना बाप्पाचा अभिषेक करता येणार आहे महत्त्वाचे म्हणजे या श्री गणेश अभिषेकासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क निश्चित करण्यात आलेले नाही भाविकांना त्यांच्या इच्छेनुसार देणगी देऊन अभिषेक करता येणार आहे अशी माहिती उत्सव प्रमुख आणि विश्वस्त पुनीत बालन यांनी दिली आहे. ज्या भाविकांना अभिषेक करायचा आहे त्यांना आधी नाव नोंदणी करून वेळ निश्चित करता येणार आहे नाव नोंदणीसाठी काही अडचण आल्यास ९०४९२३३०२९ किंवा ९८९०९९४१८२ या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे. नाव नोंदणी करू न शकलेल्या भाविकांना देखील अभिषेक करायचा असेल तर थेट उत्सव मंडपात उपलब्ध वेळेनुसार अभिषेक करता येणार आहे. भाविक यावर्षी देखील या सेवेचे स्वागत करीत आहेत व सेवेचा लाभ घेतील असा विश्वास आहे

**श्री. पुनीत बालन**
**उत्सव प्रमुख व विश्वस्त**
**श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती**



# हरतालीका व्रत

कुमारिका आणि महिला हे व्रत करतात. हरितालिका कथा ही भविष्य पुराणातील हरगौरीसंवादात आली आहे. देशाच्या अनेक राज्यांत हरितालिका व्रत साजरे केले जाते. भाद्रपद तृतीयेला केले जाणारे हे व्रत या वर्षी सोमवारी १८ सप्टेंबर २०२३ रोजी केले जाईल. या दिवशी सकाळी स्त्रिया लवकर उठून स्नानादी करून नवे कोरे वस्त्र परिधान करतात. साज श्रृगांर करतात. पूजेसाठी चौपाटावर केळ्याच्या पानांचा मंडप करून त्यात वाळूचे शिवपिंड करतात किंवा शिव पार्वतीची प्रतीमा ठेवतात. यावेळी सुहागिनीचा सर्व सामान चढवला जातो. रात्री जागरण करून स्त्रिया खेळ खेळतात, गाणी म्हणतात किंवा भजन किर्तन करतात. शेवटी कथा ऐकली जाते आणि आरती म्हणतात.

एके दिवशी शंकरपार्वती कैलास पर्वतावर बसले होते. पार्वतीनं शंकराला विचारलं, महाराज, सर्व व्रतात चांगलं व्रत कोणतं? श्रम थोडे आणि फळ पुष्कळ, असं एखादं व्रत असलं, तर मला सांगा आणि मी कोणत्या पुण्याईनं आपल्या पदरी पडले हेही मला सांगा. तेव्हा शंकर म्हणाले, जसा नक्षत्रात चंद्र श्रेष्ठ, ग्रहात सूर्य श्रेष्ठ, चार वर्णात ब्राह्मण श्रेष्ठ, देवात विष्णु श्रेष्ठ, नद्यांत गंगा श्रेष्ठ, त्याप्रमाणं हरितालिका हे व्रत सर्वात श्रेष्ठ आहे ते तुला सांगतो. तेच तू पूर्वजन्मी हिमालय पर्वतावर केलंस आणि त्याच पुण्यानं तू मला प्राप्त झालीस ते ऐक. हे व्रत भाद्रप्रद महिन्यातल्या पहिल्या तृतीयेला करावं. तू लहानपणी मी तुला प्राप्त व्हावे' म्हणून मोठं तप केलंस. चौसष्ट वर्षे तर झाडाची पिकलेली पानं खाऊन होतीस. थंडी, पाऊस, ऊन ही तिन्ही दुःख सहन केलीस. हे तुझे श्रम पाहून तूझ्या वडलांना फार दुःख आणि अशी कन्या कोणास द्यावी?' अशी त्याला चिंता पडली. इतक्यात तिथं नारदमुनी आले. हिमालयानं त्यांची पूजा व येण्याचं कारण विचारलं. तेव्हा नारद म्हणाले, तुझी कन्या उपवर झाली आहे, ती विष्णूला द्यावी. तो तिच्यायोग्य नवरा आहे. त्यांनीच मला तुजकडे मागणी करण्यास पाठविलं आहे. म्हणून इथं मी आलो आहे.

हिमालयाला मोठा आनंद झाला. त्यानं ही गोष्ट कबूल केली. नंतर नारद तेथून निघून विष्णूकडे आले. त्यांना ही हकीकत कळविली व आपण निघून दुसरीकडे गेले. नारद गेल्यावर तुझ्या वडलांनी ती गोष्ट तुला सांगितली, ती गोष्ट तुला रुचली नाही. तू रागावलीस असं पाहून तुझ्या सखीनं रागावण्याचं कारण विचारलं तेव्हा तू सांगितलंस, महादेवावाचून मला दुसरा पती करणं नाही' असा माझा निश्चय आहे. असे असून माझ्या वडलांनी मला विष्णूला देण्याचं कबुल केलं आहे. ह्याला काय उपाय करावा? मग तुझ्या सखीनं एका घोर अरण्यात नेलं. तिथं गेल्यावर एक नदी दृष्टीस पडली. जवळच एक गुहा आढळली. त्या गुहेत जाऊन तू उपास केलास. तिथं माझं लिंग पार्वतीसह स्थापिलस. त्याची पूजा केलीस. तो दिवस भाद्रपद शुद्ध तृतीयेचा होता. रात्री जागरण केलंस. त्या पुण्यानं इथलं माझं आसन हाललं, नंतर मी तिथं आलो. तुला दर्शन दिलं आणि वर मागण्यास सांगितलं. तू म्हणालीस, तुम्ही माझे पती व्हावं, याशिवाय दुसरी इच्छा नाही, नंतर ती गोष्ट मी मान्य केली व गुप्त झालो.

दुसऱ्या दिवशी ती व्रतपूजा तू विसर्जन केलीस. मैत्रिणीसह त्याचं पारण केलंस. इतक्यात तुझे वडील तिथे आले. त्यानं तुला इकडे पळून येण्याचं कारण विचारलं. मग तू सर्व झालेली हकीकत त्यांना सांगितलीस. पुढं त्यांनी तुला मलाच देण्याचं वचन दिलं. तुला घेऊन घरी गेले. मग काही दिवसांनी चांगला मुहूर्त पाहून मला अर्पण केलं. अशी या व्रतानं तुझी इच्छा पूर्ण झाली याला हरितालिका व्रत' असं म्हणतात. याचा विधी असा आहे.

ज्या ठिकाणी हे व्रत करायचं असेल त्या ठिकाणी तोरण बांधावं. केळीचे खांब लावून ते स्थळ सुशोभित करावं. पुढं रांगोळी घालून पार्वतीसह महादेवाचं लिंग स्थापन करावं. षोडशोपचारे त्याची पूजा करावी. मनोभावे त्याची प्रार्थना करावी. नंतर ही कहाणी करावी व रात्री जागरण करावं. या व्रतानं प्राणी पापापासून मुक्त होतो. साती जन्माचं पातक नाहीसं होतं. राज्य मिळतं. स्त्रियांचं सौभाग्य वाढतं. ह्या दिवशी बायकांनी जर काही खाल्लं, तर त्या जन्मवंध्या व विधवा होतात असे सांगितले जाते. दारिद्र्य येतं व पुत्रशोक होतो. कहाणी केल्यावर सुवासिनींना यथाशक्ति वाण द्यावं. दुसरे दिवशी उत्तरपूजा करावी आणि व्रताचं विसर्जन करावं.



# वास्तु शांती का करावी

**आज आपण पहाणार आहोत वास्तु शांती का करावी? प्रत्येक मानवाच्या तीन मुलभुत गरजा आहेत अन्न,वस्त्र व निवारा या गरजा भागवण्यासाठी माणुस दिवस रात्र कष्ट करत असतो. त्यातही निवारा म्हणजे वास्तु उभी करण्यासाठी लाखो रुपयांपासुन ते करोडो रुपये खर्च होतात. एवढा खर्च केलेली वास्तु चिरंजीव रहावी अस प्रत्येकाला वाटण साहजीक आहे.मग हि वास्तु चिरंजीव होण्यासाठी काय कराव?**

याच उत्तर आहे वास्तुशांती या शांतीचा उगम रामायण काळापासुन आहे. जेंव्हा श्रीराम वनवासाला गेले तेंव्हा त्यांनी रहाण्यासाठी कुटी उभारली. तेंव्हा त्यांनी लक्ष्मणाला सांगीतली की, या कुटीची वास्तुशांत कर तेंव्हा लक्ष्मणाने बाजुच्या नगरामधुन ऋषी मुनींना आणुन वास्तुशांत केली व नंतरच श्रीराम त्या कुटीत रहायला गेले.

ज्याला आपण वास्तुपुरुष म्हणुन पूजा करतो,तो नेमका कोण व कसा निर्माण हे आधी समजुन घेऊ. एकदा महादेव व अंधकासुर यांच्यात युध्द चालु असताना महादेवांचे दोन घर्मबिंदु जमीनीवर पडले, त्यातुन एक महाभयानक मानव तयार झाला. त्याला जन्मताच भयानक भुक लागली, त्याने अंधकासुरासह त्याची सर्व सेना खाऊन टाकली, तरी त्याची भुक भागेना तेव्हा त्याने भक्ष म्हणुन महादेवावर चाल केली तेव्हा सर्व (४५ देवता) देवांनी मिळुन त्याला पालथा पाडला व सर्व देव त्याच्या शरीरावर बसले,त्या नंतर त्याने महादेवांची स्तुती केली,यावर महादेवांनी त्याला वर दिला की, तुझ्या शरीरावर बसलेले सर्व (४५) देव तुझ्यात वास करतील व तु 'वास्तुपुरुष' अथवा 'वास्तुदेवता' म्हणून ओळखला जाशील.

ज्या वेळी मानव नवीन घर, वाडे, मंदीर, नगर वसवेल त्या वेळी प्रथम तुझी पूजा करुन तुला बलीपिंड देईल, तो खाऊन तु तुझी भुक भागव व त्या वास्तु मधे रहाणाऱ्या लोकांची भरभराट कर व जे लोक तुझी पूजा करणार नाहीत, तुला बलीपिंड देणार नाहीत, त्यांची वास्तु तु खाऊन टाक अशा रितीने वास्तुपरुष पूजनाची सुरवात झाली.

**वास्तुशांती का करायची**

वास्तु तयार झाल्यावर त्यातील प्रत्येक अणुरेणुवर केलेली वैदीक प्रक्रिया म्हणजे वास्तुशांती. जेव्हा वास्तु निर्माण क्रिया चालु होते, त्यावेळी भुमी खोदली जाते,तुडवली जाते,कापली जाते त्या वेळी जे दोष निर्माण होतात.तसेच हे कार्य करताना अनेक कृमी,किटक,प्राणी, वनस्पती यांची हत्या होते या सर्वांचा दोष मला येऊ नये,आला असेल तर तो निघुन जावा. शत्रुबुध्दीचा नाश व्हावा या वास्तुत रहाणाऱ्या माझ्या परीजनांना धन, धान्य, पुत्र, पौत्र, दिर्घायुष्य यांचा उत्तम लाभ व्हावा, म्हणुन वास्तुशांती केली जाते. वास्तुशांती केल्याने वातावरणाची शुध्दी होते व करणाऱ्याच्या मनाची व देहाची शुध्दी होते. म्हणुन तुम्हा सर्वांना विनंती आहे की,वास्तु निर्माण झाल्यावर इंटीरीयर साठी वा अन्य कारणांनी जी काही तोडफोड करायची असेल,ती वास्तुशांती च्या अगोदर करुन घ्या. वास्तुशांती झाल्यावर असे काही प्रकार केल्यास वास्तुभंग योग तयार होतो व लाखो रुपये मोजलेल्या वास्तुत तुम्हाला सुख लाभत नाही,यावर म्हणजे परत वास्तुशांती करावी लागते.

# गौरी महालक्ष्मी



हिंदू परंपरेने नुसार पार्वती उमा अर्पणा अंबाबाई म्हणजे 'गौरी' संस्कृत शब्द उत्पत्ती प्रमाणे आठ वर्षाची, अनाघ्रात अशी पवित्र कन्या. तसेच गौरी म्हणजे गोरी, (हिमालय कन् उ म्हणजे हिमालयपर्वत भागातील(पार्वती) उज्जल गौर वर्णाची गौरी.. भारतभर गौरी म्हणजे पार्वती ( शंकर पत्नी) भारतभर देवीची जी शक्तीपीठे आहेत , ती आदिशक्ती उमा पार्वतीची स्थाने आहेत .भारतीय संस्कृतीचे वर्णन ज्या दोन शब्दात केली जाते ते म्हणजे शिव शक्ती शक्तीची विविध रूपे लोक देवता आणि शक्ती पीठे म्हणून भारतभर आहेत तिला अनेक नावे आहेत .

गौरी पार्वतीचे एक नाव महालक्ष्मी आहे. गावगडयात लक्ष्मीआई म्हणून सर्वार्थाने रुढ शब्द सबंध महाराष्ट्रात हेनाव पूर्वापार वापरला जाते. लक्ष्मीआईचे वाहन नंदी आहे. गजांतलक्ष्मी हे भगवती पार्वतीच एक रूप आहे. लोकदेवता लक्ष्मीआई व व्यापारी लोकांची पनीदेवता यातून त्यासम इतर देवतांचे धार्मिक जीवनात स्थान निर्माण झाले.

ज्येष्ठा आणि गौरी अशा दोन देवींचे पूजन या प्रसंगी केले जाते. गौरी या शब्दाचा अर्थ आहे गौर वर्णाची. तर ज्येष्ठा गौरीपूजन असा उल्लेख का केला जातो तर ती भाद्रपद महिन्यातील अनुराधा नक्षत्रावर गौरी आगमन तर ज्येष्ठ नक्षत्राला गौरी पूजन होते

शेतीचा शोध स्त्रीयांनी लावला. शेती संबंधी कृषी संस्कृती विकास करण्यामध्ये पावर्ती गौरी व शिव महादेवाचे मोठे योगदान आहे . शेतीच्या आधीची .रानटी अवस्था अभूती आणि असमृद्धीची परिस्थिती आणि शेतीचा शोध लागल्यानंतर धन धान्यानं संपन्न कांतीमान असलेलं जीवन या दोन अवस्थांचं मूर्त स्वरूप म्हणजे पार्वती गौरीनेविकसित केलेली कृषी संस्कृती. हे शक्य झालं ते बुद्धीच्या विकासामुळे. म्हणूनच अनेक कुटुंबांत ज्येष्ठा आणि कनिष्ठा यांच्या मध्ये गणपती अर्थात बुद्धीच्या देवतेला आणून बसवतात. पूर्वी ताटात मावणार नाहीत इतके पदार्थ करण्याची परंपरा होती. हे देखील सुबत्ता आणि समृद्धीचं प्रतिक आहे.

## व्रताचे स्वरूप

भाद्रपद महिन्यात हरतालिका व्रत (पार्वतीचे महादेव प्राप्तीसाठी केलेले अपर्णाव्रत त्यानंतर गणेश आगमन१शुद्ध पक्षात व त्यानंतर .गणेश मातेचे अनुराधा नक्षत्रावर आगमन आपापल्या कुलाचाराप्रमाणे प्रतिमा वा प्रतीके बसवितात. ज्येष्ठा नक्षत्रावर गौरी पार्वतीची पूजा करतात व महानैवेद्य दाखवितात. तिसऱ्या दिवशी मूळ नक्षत्रावर गौरी विसर्जन करतात. गौरीलादवी ला भारतभर असंख्य नावे आहेत त्यापैकी गावगाड्यात तिला लक्ष्मी आई वा महालक्ष्मी म्हणतात आणि तिची ज्येष्ठा नक्षत्रावर पूजा होते म्हणून तिला ज्येष्ठा गौरी म्हणतात.४

हिंदू देवताशास्त्रात तसेच सम ाजजीवनात गौरी हे शिवाच्या शक्तीचे आणि गणेशाच्या आईचे रूप मानले गेले आहे.५ अपराजितपृच्छा या ग्रंथामध्ये द्वादशगौरींचा उल्लेख येतो. अग्निपुराणामध्ये गौरी मूर्तीचे सामूहिक पूजन केले जाई असे सांगितले आहे. लातूर येथील नीलकंठेश्वर मंदिरात शिवाची आणि गौरीची एक सुंदर कोरीव प्रतिमा आहे. त्यांच्या पायाशी एक घोरपड दाखवली आहे. गौरीच्या डाव्या हातात बीजपूरक आहे, केसांवर फुलांची वेणी आहे. ही शिव परिवारातील देवता असून कनोज येथे हिचे मंदिर आहे.

एकदा असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया महालक्ष्मी गौरीकडे गेल्या आणि त्यांनी आपले सौभाग्य अक्षय्य करण्याविषयी तिची प्रार्थना केली. त्याला अनुसरून गौरीने असुरांचा संहार केला व शरण आलेल्या स्त्रियांच्या पतींना व पृथ्वीवरील प्राण्यांना सुखी केले. महालक्ष्मीच्या कृपाप्रसादाने आपापल्या सौभाग्य प्राप्त झाले म्हणून तेव्हापासून सर्व स्त्रिया महालक्ष्मी गौरीची पूजा करू लागल्या.६

## आशय व महत्त्व

महालक्ष्मीचा सण हा कुलाचार म्हणून सर्व जाती-जमातीतून श्रद्धापूर्वक पाळला जातो. शेती हा प्रमुख व्यवसाय असणाऱ्या घरांतून मात्र स्त्रिया धान्याची राशी मांडून पूजा करतात. लक्ष्मी वा गौरीच्या मांडणीत विविधता असली तरी मूळ हेतू धान्य लक्ष्मीच्या पूजेचा, भूमीच्या सुफलीकरणाचा आहे.७

## तेरड्याची फुले

गौरींच्या मांडणीच्या विविध पद्धती

स्थळपरत्वे गौरींच्या पूजेंची पद्धत आणि परंपरा बदलल्या आहेत. काही कुटुंबात गौरींचे मुखवटे असतात, तर काही कुटुंबात परंपरेनुसार पाणवठ्यावर जाऊन पाच, सात किंवा अकरा खडे आणून त्यांची पूजा करतात. काही ठिकाणी पाच मडक्यांच्या उतरंडी करून त्यावर गौरीचे मुखवटे लावून त्या उतरंडींनाच साडी चोळी नेसवतात आणि त्यांची पूजा करतात. काही घरांत धान्यांची रास म्हणजेच गहू, तांदूळ, ज्वारी, हरभरा, डाळ इत्यादींपैकी एकदोन धान्याचे ढीग करून त्यावर मुखवटे ठेवतात. बाजारात पत्र्याच्या, लोखंडी सळयांच्या किंवा सिमेंटचे कोथळे मिळतात. त्यावर मुखवटे ठेवतात आणि कोथळ्यांना साडी चोळी नेसवतात.८ सुपात धान्याची रास ठेवून त्यावर मुखवटा ठेवतात.९ किंवा गहू आणि तांदूळ यांनी भरलेल्या तांब्यांवर मुखवटे ठेवून पूजा करतात. तेरड्याचीही गौर असते. तेरड्याची रोपे मुळासकट आणतात. ही मुळे म्हणजेच गौरींची पावले, असा समज आहे. आधुनिक काळात गौरीपूजनाच्या व मांडणीच्या पद्धतीत व गौरीच्या रूपातही आधुनिकता दिसून येते. विविध रूपांत अनेक घरांत गौरी/महालक्ष्मी येतात. आगम नाच्या दिवशी संध्याकाळी किंवा पंचांगात शुभ वेळ बघून मुखवट्यांची आणि लक्ष्मींच्या हातांची पूजा होते. त्याच रात्री गौरी उभ्या केल्या जातात. या गौरी/महालक्ष्मी किंवा सखी-पार्वतींसह त्यांची मुलेही (एक मुलगा आणि एक मुलगी) मांडतात. कोणी धातूची लक्ष्मीची प्रतिमा करून पूजतात, कोणी मातीची बनवितात तर कोणी कागदावर देवीचे चित्र काढून त्याची पूजा करतात.

## गौरी आवाहन (दिवस पहिला)

आपापल्या परंपरेप्रमाणे घराच्या उंबऱ्यातून आत आणताना, जिच्या हातात गौरी असतील त्या बाईचे पाय दुधाने व पाण्याने धुतात आणि त्यांवर कुंकवाचे स्वस्तिक काढतात. घराच्या दरवाज्यापासून ते जिथे गौरी बसवायच्या त्या जागेपर्यंत लक्ष्मीच्या पायांचे ठसे उमटवत उमटवत गौरींचे मुखवटे आणतात. त्यावेळी ताट चमच्याने किंवा घंटेने वाजवत आवाज केला जातो. यानंतर त्यांची स्थापना करण्यापूर्वी त्यांना घरातील समृद्धी, दुध-दुभत्याची जागा इ. गोष्टी दाखविण्याची प्रथा आहे. तेथे त्यांचे आशीर्वाद मिळून ऐश्वर्य नांदो अशी प्रार्थना करतात.काही ठिकाणी लोक तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा बनवितात व तिच्यावर मातीचा मुखवटा चढवितात.नंतर त्या मूर्तीला साडी नेसवून दागदागिन्यांनी सजवितात.१०पहिल्या दिवशी संध्याकाळी गौरीला भाजी-भाकरीचा नैवैद्य दाखवण्याची पद्धत काही भागात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात आहे.११ या प्रथेला गौरी आवाहन करणे असे संबोधतात.

## गौरीपूजन (दिवस दुसरा)

दुसऱ्या दिवशी म्हणजेच ज्येष्ठा नक्षत्रावर गौरींची पूजा होते. सकाळी गौरींची/महालक्ष्मीची पूजा-आरती करून केलेल्या फराळाचा (रव्याचा लाडू, बेसनलाडू, करंजी, चकली, शेव, गुळपापडीचा लाडू) नैवेद्य दाखवतात. नंतर संध्याकाळी आरती करतात. पुरणपोळी, ज्वारीच्या पिठाची आंबील, अंबाडीची भाजी, सोळा भाज्यांची एकत्र भाजी, दिवेफळ वगैरे पदार्थांचा नैवेद्यात समावेश असतो.१२नैवेद्यात शेंगदाणा आणि डाळीची चटणी, पंचामृत, पडवळ घालून केलेली ताकाची कढी, कटाची आमटी, वेगवेगळ्या प्रकारची भजी, पापड, लोणचे इत्यादी. केलेले सर्व पदार्थ केळीच्या पानावर ठेवतात.११ महाराष्ट्रात काही जागी याच सायंकाळी महिलांचा हळदीकुंकवाचा कार्यक्रम केला जातो. दर्शनाला आलेल्या महिला व मुलींचे आदरपूर्वक स्वागत करण्याची पद्धती प्रचलित आहे.

## विसर्जन (दिवस तिसरा)

तिसऱ्या दिवशी म्हणजेच मूळ नक्षत्रावर गौरींचे/महालक्ष्मींचे विसर्जन करतात. त्या दिवशी सकाळी पोवत्याच्या/सुताच्या गाठी पाडतात. त्या सुतात हळदीकुंकू, सुकामेवा, बेलफळ, फुले, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल, रेशमी धागा असे एक एक जिन्नस घालून गाठी पाडतात. यांमध्ये हळदीकुंकू, रेशमी सूत, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल हे महत्त्वाच्या वस्तू असतात. नंतर गौरींची/ महालक्ष्मींची पूजा आणि आरती करतात. गोड शेवयाची खीर, उडीद डाळीचा भाजलेला पापड याचा नैवेद्य दाखवतात. या तिसऱ्या दिवशी गौरींच्या/ महालक्ष्मींच्या चेहऱ्यावर एक प्रकारची उदासीनता दिसून येते. गौरींची पूजा, आरती करून पुढील वर्षी येण्याचे आमंत्रण देऊन त्यांचा निरोप घेतला जातो, आणि त्यांचे विसर्जन केले जाते.११(धातूच्या किंवा कायम स्वरूपाच्या मूर्ती असतील तर त्यांचे विसर्जन करत नाहीत.) गौरींचे पाण्यात विसर्जन केल्यावर परत येताना थोडी वाळू घरी आणून ती सर्व घरभर व परसातल्या झाडांवर टाकतात. त्यायोगे घरात समृद्धी नांदते व झाडाझुडुपांचे कीटकांपासून संरक्षण होते अशी समजूत आहे.

## दोरकाची पूजा

या तिसऱ्या दिवशी महाराष्टातील ग्रामीण बहुजनसमाजात गौरींच्या पूजेबरोबरच सुताच्या गुंड्याला सोळा गाठी देऊन त्याचीही पूजा करतात. तो गुंडा मग हळदीने रंगवून त्यातला दोरा घरातल्या सुवासिनी आपल्या गळ्याभोवती बांधतात व नवीन पीक येईपर्यंत गळ्यात ठेवतात.आश्विन वद्य अष्टमीला तो गळ्यातून काढून त्याची पूजा करतात. या दोऱ्यालाच महालक्ष्मी समजतात.

भाद्रपद शुक्ल तृतीयेला गौरीचा सण सुरू होतो व तो बरेच दिवस चालतो. प्रत्येक गावात गौरीची एक पिठाची प्रतिमा करतात व तिला मखरात बसवून पूजतात. तिची रस्त्यातून मिरवणूकही काढतात.

महाराष्ट्रातील कोकण प्रांतातील कोळी समाजगटातील ,महिला या दिवशी तेरड्याची फांदी आणून तिला लक्ष्मीस्वरूप मानून तिची पूजा करतात. या दिवशी देवीला माशाचा नैवेद्य दाखविला जातो. तसेच भाजी भाकरीचा सुद्धा नेवैद्य दाखवला जातो.

## लोकसाहित्यातील उल्लेख

**ज्येष्ठा गौरी व्रतातील खड्यांच्या गौरी**
**लोकसाहित्यात गौरीपूजन प्रसंगी म्हटली जाणारी गीते आहेत**
**आली आली लक्ष्मी, आली तशी जाऊ नको**
**बाळाला सांगते, धरला हात सोडू नको.**
**मला आहे हौस, चांदीच्या ताटाची**
**लक्ष्मीच्या नैवेद्याला मूद साखरभाताची.**
**लक्ष्मीबाई आली सोन्याच्या पावलांनी**
**ज्येष्ठेच्या घरी कनिष्ठा आली**
**मालकाच्या घरी लक्ष्मी आली**

# ऑक्टोबरपासून चेकसाठी नवीन नियम

**मुंबई** – नव्या नियमांनुसार आरबीआय येत्या काही दिवसांत चेक क्लीअर करायची नवी पद्धत अमलात आणणार आहे. जेणेकरून बँकेत चेक जमा केल्यास पुढच्या काही तासांत खात्यात पैसे जमा होणार आहेत. येत्या ४ ऑक्टोबरपासून रिझर्व्ह बँकेचे नवीन चेक क्लीअरिंगचे नवीन नियम लागू होणार असल्याचे सांगितले जातेय. बँकिंग क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान आणि नव्या कार्यप्रणालीचा आवलंब केला जात असल्याने चेक पेमेंट संदभार्तील हा नियम खातेधारकांना मदतशीर ठरणार आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, रिझर्व्ह बँकेने चेक क्लीअरन्सच्या नियमांमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्यामुळे चेक क्लीअरन्सला लागणाऱ्या वेळेत मोठी बचत होणार आहे.

रिझर्व्ह बँकेने चेक ट्रान्सेक्शन सिस्टीम म्हणजे उळर चे रूपांतर सतत क्लीअरिंग व सेटलमेंट ऑन रिअलायझेशनमध्ये करण्याची घोषणा केली. येत्या ४ ऑक्टोबरपासून ही नवी कार्यप्रणाली लागू केली जाणार असल्याचे सांगितले जातेय.

सध्याच्या घडीला बँकेत चेक जमा केल्यावर चेक क्लीअर होण्यासाठी लागणारा वेळ आणि ग्राहकांची गैरसोय लक्षात घेता मध्यवर्ती बँकेने त्यांच्या नियमांम ध्ये लक्षणीय बदल केले आहेत. परिणामी नवीन सिस्टीमप्रमाणे बँकेत चेक जमा केल्यावर काही तासांतच चेक क्लीअर होऊन तुमच्या खात्यात पैसे जमा होणार आहेत. त्यामुळे पूर्वी लागणाऱ्या एक-दोन दिवसांच्या वेळेचे काम नवीन सिस्टीममध्ये काही तासांतच पूर्ण होणार आहे.

## प्रवाशाच्या सोईसाठी यंदा विशेष रेल्वे सेवा उपलब्ध

**मुंबई** – यंदाच्या गणेशोत्सवाच्या काळात प्रवाशांना सुलभ आणि आरामदायी प्रवास उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय रेल्वेने ३८० गणपती विशेष रेल्वे फेऱ्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रातून कोकण आणि इतर राज्यांमध्ये जाणाऱ्या प्रवाशांची मोठी मागणी लक्षात घेऊन ही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या ३८० फ ेऱ्यांपैकी सर्वाधिक म्हणजेच २९६ फेऱ्या मध्य रेल्वेच्या, ५६ फेऱ्या पश्चिम रेल्वेच्या, सहा फेऱ्या कोकण रेल्वेच्या तर २२ फेऱ्या दक्षिण रेल्वेच्या मार्गांवर चालवल्या जाणार आहेत. गणेशोत्सव यंदा २७ ऑगस्टपासून ते ६ सप्टेंबरपर्यंत साजरा केला जाणार आहे. या उत्सवासाठी प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेऊन ११ ऑगस्टपासूनच गणपती विशेष रेल्वे सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. या विशेष रेल्वे सेवांचा विस्तार कोकण रेल्वे, मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वेच्या प्रमुख मार्गांवर करण्यात आला आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी या विशेष रेल्वेगाड्यांचे थांबेही वाढवण्यात आले आहेत, जेणेकरून जास्तीत जास्त लोकांना त्यांच्या गावी पोहोचता येईल.

# श्रीगणेशाला प्रसन्न करण्यासाठी कोणता रंग हवा?

**हत्तीला श्रीगणेशाचे प्रतीक मानले जाते. चला तर आज जाणून घेऊया की कोणत्या राशीच्या जातकाने त्वरित फळ लाभण्यासाठी कोणत्या रंगातील गणेशमूतीर्चे पूजन करावे.**

देवांचे देव गणनायक रिद्धी-सिद्धी दाता श्रीगणेशाचा जन्म भाद्रपद शुक्ल चतुथीर्ला दुपारी झाला. पार्वतीमातेने जेव्हा श्रीगणेशाला अवतरित केले. जेव्हा ते अवतरित झाले तेव्हा ते गणेशदेव झाले नव्हते. शिवशंकरांनी त्यांची परीक्षा घेतली. सांगितले, 'जा, सर्वप्रथम जो साया सृष्टीला फेरी मारून येईल तोच देवांमध्ये श्रेष्ठ समजला जाईल आता गणेशाचे शरीरही मोठे आणि त्यांचे वाहन असणारा उंदौर खूपच लहान. अशावेळी त्यांनी कसे जावे, शिवाय कार्तिकस्वामी आपल्या वाहनावर मोरावर बसून सृष्टीला चक्कर मारण्यासाठी गेलेदेखील. गणेशाने विचार केला की आई वडिलांच्या पायाशीच सारी सृष्टी असते. तर का नाही त्यांनाच स्मृत प्रदक्षिणा घालाव्यात. असा विचार करून गणेशाने तिथे बसलेल्या शिव-पार्वतीभोवती सात प्रदक्षिणा घातल्या. त्यानंतर कार्तिकस्थ्यमी सृष्टीला प्रदक्षिणा घालून आले. जेव्हा निर्णयाची वेळ आली तेव्हा असा निर्णय झाला की जन्मदातेच सर्वश्रेष् असतात, जर ते नसते तर आपण जन्मालाच आलो नसतो. यामुळे गणेशच सर्वश्रेष्ठ बुद्धिमान व गणपती मानले गेले. तेव्हापासून सर्वच मंगल कार्यामध्ये श्रीगणेशाला सर्वप्रथम पूजेचा मान मिळाला.

स्वाती राहूच्या नक्षत्रात जन्मलेल्या श्रीगणेशाला राहूची महादशा असल्यामुळे त्यांचे डोके उडवले गेले आणि हत्तीच्या पिल्लाचे डोके लावले गेले. तेव्हापासून हत्तीला श्रीगणेशाचे प्रतीक मानले जाते. चला तर आज जाणून घेऊया की कोणत्या राशीच्या जातकाने त्वरित फळ लाभण्यासाठी कोणत्या रंगातील गणेशमूतीर्चे पूजन करावे. मेष व वृश्चिक या राशीच्या जातकांनी सुख-शांती व रिद्धी-सिद्धीसाठी सेंदरी रंगाच्या श्रीगणेशाची स्थापना करून शुभमंत्रानी त्याची पुजा करावी.



# दोन धाडसी तरूणांनी गाईचे प्राण वाचवले



हिमाचल प्रदेशच्या डोंगराळ भागात, एका गावातील दोन धाडसी तरुणांनी एका आजारी गायीला पाठीवर घेऊन, अरुंद वाटेने चालत डोंगराच्या दरीत पडण्याच्या धोक्याची पर्वा न करता पशु रुग्णालयात नेले. शहरे आणि गावांमध्ये गोरक्षणाचे काम करणारे अनेक स्वयंसेवक आहेत, परंतु हिमाचलच्या डोंगराळ भागात दीड ते दोन क्विंटल वजनाची आजारी गाय पाठीवर घेऊन रुग्णालयात घेऊन जाणाऱ्या दयाराम आणि लाल सिंग यांच्या धाडसाची बरोबरी कोणीही करू शकत नाही. शिलाई विधानसभा मतदारसंघातील कुरई गावातील एका रहिवाशाची गाय अनेक दिवसांपासून आजारी होती. पशुवैद्यकीय रुग्णालय तीन किलोमीटर अंतरावर होते; परंतु धोकादायक डोंगराळ रस्त्यावर मुसळधार पावसात गाय कशी घेऊन जायची, हा प्रश्न होता. गावातील या दोन धाडसी जणांनी गाय वाचवण्यासाठी आपला जीव धोक्यात घातल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि देशभरातून मानवतेच्या कार्याबद्दल कौतुकाचे पूल बांधले गेले.

# महापालिकेमध्ये नोकरीच्या आमिषापासून सावध राहा

## प्रशासनाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे नागरिकांना केले सतर्क

**शिवाजीनगर** – पुणे महापालिकेत नोकरी लावण्याचे तसेच कॉन्ट्रैक्टरवर कार्यरत कर्मचाऱ्यांना कायम करण्याचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक करण्याचे काही प्रकार समोर आले आहेत. काही मध्यस्थ व दलाल नागरिकांकडून पैशांची मागणी करत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारच्या फसवणूक प्रकरणांबाबत सतर्कता बाळगण्याचे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

पुणे महापालिकेमध्ये विविध पदांसाठी भरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने केली जाते. यासाठी वेळोवेळी स्थानिक दैनिक वृत्तपत्रांमध्ये सविस्तर जाहिराती प्रसिद्ध केल्या जातात; तसेच महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर संबंधित भरतीबाबतची माहिती देऊन पात्र उमेदवारांकडून फक्त अधिकृत पोर्टलवरूनच ऑनलाइन अर्ज मागविले जातात. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत म्हटले आहे की, नागरिक व उमेदवारांनी कोणत्याही परिस्थितीत भरतीसंबंधी अफवांवर विश्वास ठेवू नये, कायम नोकरी लावून देण्याचे दावे पूर्णपणे खोटे आहेत; तसेच कॉन्ट्रॅक्टवर




नियुक्त केलेले कर्मचारी केवळ निश्चित कालावधीसाठीच कामावर मावर घेतले जातात. त्यांना कायम करण्याचा कोणताही प्रस्ताव नाही. जर कोणतीही व्यक्ती नोकरीसंदर्भात पैशांची मागणी करत असेल किंवा चुकीची माहिती देत असेल, तर अशी घटना त्वरित संबंधित विभागाला कळवावी, कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार करू नये; अन्यथा नागरिक व उमेदवारांची फसवणूक होण्याची शक्यता असते. अशा प्रकरणात महापालिका प्रशासन जबाबदार राहणार नाही. याची सर्व नागरिक व उमेदवारांनी नोंद घ्यावी. पुणे महापालिकेमध्ये कर्मचारी भरती केली जाणार असल्यास त्याबाबतची जाहिराती केवळ अधिकृत दैनिक वृत्तपत्रांमध्ये आणि पालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल त्यामुळे नागरिक व उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावर जाऊनच माहिती मिळवावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# आकाशयान आता गगनात

**बंगळुरु** – यावर्षी डिसेंबरमध्ये पहिल्या मानवरहित मोहिमेसाठी गगनयान-जी१ प्रक्षेपत केले जाणार आहे. इस्त्रोचे प्रमुख व्ही. नारायणन यांनी केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह आणि ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला आणि प्रशांत बालकृष्णन नायर यांच्यासह संयुक्त पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

नारायणन म्हणाले, की गेल्या चार महिन्यात या क्षेत्रात अनेक नवीन कामगिरी बजावण्यात आली आहे. त्यात अनेक प्रयोग यशस्वी ठरले आहेत. त्यातच पहिले मानवविरहीत मिशन जी-१ या वर्षाच्या अखेरीस, डिसेंबरच्या जवळपास प्रक्षेपित करण्यात येईल. त्यात अर्धमानव सारखी दिसणारी व्योमामित्रा सुद्धा अंतराळात जाणार आहे. यशस्वी ॲक्सिओम-४ मोहिमेवर शुक्ला होते. ते परत आले आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाचा

## मोहीम डिसेंबर २०२५ मध्ये

अनुभव भारताच्या स्वतःच्या गगनयान मोहिमेसाठी आणि भारतीय अंतराळ स्थानकासाठी उपोयगी ठरणार असल्याचे शुक्ला यावेळी म्हणाला. गगनयान मोहीम संपूर्ण देशासाठी एखाद्या मोहिमेपेक्षा कमी नाही असे शुक्ला म्हणाले. गगनयान मोहिमेत पहिले मानवरहित मिशन यंदाच पूर्ण होणार आहे. पहिली म ानवरहित मोहिम डिसेंबर २०२५ मध्ये व्योममित्र या अर्ध-मानव रोबोटसह प्रक्षेपित केली जाईल. त्यानंतर आणखी दोन मानवरहित मोहिमा राबवण्यात येतील. या चाचण्या मानव सदृश परिस्थितीत यंत्रणांची कार्यक्षमता तपासतील. तर २०२७ मध्ये भारतीय पाऊल अंतराळात पडेल.

# निगडी-चाकण मेट्रोसाठी १० हजार कोटींचा आराखडा

## पिंपरी-चिंचवड व चाकण एमआयडीसी, हिंजवडी आयटी पार्कचा भाग मेट्रोने जोडला जाणार

**पिंपरी** - पिंपरी-चिंचवड शहरात मेट्रोचा दुसरा मार्ग साकारला जाणार आहे. निगडी ते चाकण या ३१ स्टेशन असलेल्या ४०.९२६ किलोमीटर अंतराच्या मागार्साठी एकूण १० हजार ३८३ कोटी ८९ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. या मागार्मुळे पिंपरी-चिंचवड व चाकण एमआयडीसी तसेच, हिंजवडी आयटी पार्कचा भाग

मेट्रोने जोडला जाणार आहे. पिंपरी-चिंचवड उद्योगनगरीत सध्या दापोडी ते पिंपरी अशी मेट्रो धावत आहे.

या मार्गाचा निगडी येथील भक्ती शक्ती समूह शिल्प चौकापर्यंत ४.५१९ अंतर विस्तारीकरणाचे काम सुरू आहे. दापोडी ते निगडी या एकमेव मेट्रो मागार्नंतर आता, निगडीच्या भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक ते चाकण असा दुसऱ्या मार्गाचा आराखडा तयार झाला आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (महामेट्रो) डीपीआर पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे सादर केला आहे. सध्या असलेल्या मेट्रो मार्गिकेप्रमाणेच हा मार्ग उन्नत (एलिव्हेटेड) असणार आहे. या एकूण १० हजार ३८३ कोटी ८९ लाख खर्चाचा डीपीआरमध्ये एकूण ३१ मेट्रो स्टेशन आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात सर्वाधिक २५ स्टेशन आहेत. त्यातील नाशिक फाटा ते संत तुकारामनगर मेट्रो स्टेशन असे १.३३६ किलोमीटर अंतराचा मार्ग तयार आहे.

### महापालिकेचा १५ ते २० टक्के हिस्सा

निगडी ते चाकण मेट्रो मार्गाच्या प्रकल्पासाठी एकूण १० हजार ३८३ कोटी ८९ लाख खर्च अपेक्षित आहे. त्या खर्चात केंद्र शासनाचा १० टक्के आणि राज्य शासनाचा १० टक्के हिस्सा असणार आहे. तर, पिंपरी-चिंचवड महापालिकेचा खचार्चा हिस्सा १५ ते २० टके असणार आहे.



उर्वरित ६० टक्के निधी कजार्तून उभारला जाणार आहे.

### असा असेल मार्ग

निगडीतील भक्ती-शक्ती समूहशिल्प चौक, ट्रान्सपोर्टनगर, गणेशनगर, मुकाई चौक, रावेत, पुनावळे गाव, पुनावळे, ताथवडे गाव, ताथवडे, भूमकर चौक, भुजबळ चौक, वाकड, विशालनगर कॉर्नर, कोकणे चौक, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, नाशिक फाटा, संत तुकारामनगर, वल्लभनगर (वायसीएमजवळ), गवळीमाता चौक, भोसरी एमआयडीसी, वखार महामंडळ गोदाम चौक, पीआयईसी, मोशीतील भारतमाता चौक, चिंबळी फाटा, बर्गेवस्ती, कुरळी, आळंदी फाटा, नाणेकरवाडी, चाकण.

# पाकिस्तानी दरवर्षी भीक मागून कमवतात ४२ अब्ज डॉलर

पाकिस्तान - पाकिस्तानमधील सर्वांत महत्त्वाच्या व्यवसायापैकी एक व्यवसाय भीक मागण्याचा आहे. अर्थात हे स्वाभाविक आहे, कारण पाकिस्तानच्या २३ कोटी लोकसंख्येपैकी ४ कोटी भिकारी आहेत. पाकिस्तानात दर सहा पाकिस्तानीपैकी एक व्यक्ती भिकारी आहे.ते केवळ पाकिस्तानात भीक मागतात असे नाही तर त्यांनी भीक मागण्याचे आंतरराष्ट्रीयीकरण देखील केले आहे, परदेशात दिसणारे ९० टक्के भिकारी हे पाकिस्तानी आहेत.

### पाकिस्तानी भिकाऱ्याचे दैनिक उत्पन्न ८५० रुपये

एका अहवालानुसार, मध्य पूर्वेतील देश देखील पाकिस्तानी भिकाऱ्यांना कंटाळले आहेत. पाकिस्तानी भिकाऱ्याचे सरासरी दैनिक उत्पन्न ८५० पाकिस्तानी रुपये आहे. भिकारी दररोज ३२ अब्ज पाकिस्तानी रुपये कमवतात, जे दरवर्षी १.१७ लाख कोटी रुपये इतके आहे.

### डॉलरमध्ये वार्षिक उत्पन्न ४२ अब्ज डॉलर

पाकिस्तानमधील चाळीस दशलक्ष लोक काहीही न करता भीक मागून दरवर्षी ४२ अब्ज डॉलर कमवत आहेत. याचा भार पाकिस्तानच्या उर्वरित लोकसंख्येवरही पडत आहे आणि महागाई वाढल्याने भीक मागण्याची प्रवृत्तीही वाढली आहे. पाकिस्तानमधील बिझनेस अँड सोसायटी सेंटरच्या अहवालात असे दिसून आले आहे, की देशात भीक मागण्याची प्रवृत्ती इतकी वाढली आहे, की इतर अकुशल काम करून अधिक कमाई करण्याऐवजी

### दर ६ लोकांमागे १ भिकारी



त्यातून अधिक उत्पन्न मिळते.

### पाकिस्तानच्या प्रमुख शहरांमध्ये १ कोटी २० लाख बालभिकारी

आशियाई मानवाधिकार आयोगाच्या मते, पाकिस्तानच्या लोकसंख्येपैकी सुमारे ११ टके लोक उपजीविकेसाठी भीक मागत आहेत पाकिस्तानच्या प्रमुख शहरांमध्ये १ कोटी २० लाख बालभिकारी आहेत. परदेशात पकडलेले ९० टक्के भिकारी पाकिस्तानी वंशाचे असल्याने हे आकडे गोळा केले जात आहेत. इराक सौदी अरेबियाच्या राजदूतांनीही याबद्दल पाकिस्तान सरकारकडे तक्रार केली आहे. गेल्या अडीच वर्षांत सौदी अरेबिया आणि इतर आखाती देशांमधून ४४ हजार भिकाऱ्यांना पाकिस्तानला परत पाठवण्यात आले आहे.




# महिला आणि तरुणांना स्वातंत्र्य दिले तर ते कर्तृत्व सिध्द करतात

**पुणे :** भारतातील लोकशाही व्यवस्थेमुळे व बँकांच्या राष्ट्रीयकृत घोरणांमुळे भारत आज विकसनशील देशांपैकी एक आहे. मात्र स्वातंत्र्यवेळी देशातील साक्षरतेचे प्रमाण खूप कमी होते. कालांतराने राजीव गांधी यांच्या काळात देशात रोजगार पुरक शिक्षण व्यवस्था व संगणक व इंटरनेट क्रांती झाली. अन डिजिटल इंडियाची पायाभरणी झाली. यातून आपल्याला दिसून येते की देशात महिला आणि तरुणांना स्वातंत्र्य दिले तर ते कर्तृत्व सिद्ध करतात, असे मत काँग्रेसचे ज्येष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी व्यक्त केले.

शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत संगणक आणि सॉफ्टवेअर कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या एन. एम. डी . प्रा. लि. आणि एन. एम. डी. इन्फॉटेकच्या आठव्या वर्धापन दिनी ते बोलत होते. यावेळी आमदार विक्रमसिंह पाचपुते, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्या रुपाली ठोंबरे पाटील,श्रॉफ ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि चेअरमन जे. पी. श्रॉफ, वरिष्ठ पोलिस अधिकारी पी. आय वाघमारे, एनएमडी ग्रुपचे संस्थापक नवनाथ मोहन दरेकर, प्रशांत दरेकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना गोपाळदादा तिवारी म्हणाले, नुकतेच झालेल्या सिंदूर ऑपरेशन मधील कर्नल सोफिया असेल किंवा येथे शेतकऱ्यांच्या मुलांना पाठबळ देणारा नवनाथ दरेकर सारखा तरुण असेल त्यांनी हे दाखवून दिले आहे. त्यामुळे सर्व सामान्य शेतकरी कुटुंबातील तरुणांना आपल्या स्वप्नांना आकार देण्याचे बळ लाभले.

अभिनेत्री प्रार्थना बेहेरे म्हणाली, मी जेव्हा जेव्हा परराज्यात किंवा परदेशात जाते तेव्हा मराठी उद्योजक दिसत नाही. मराठी माणूस उद्योग, व्यवसाय करू शकत नाही, असं बोललं जात पण आज मला मराठी असल्याचा अभिमान वाटतोय. एक वेगळीच पॉझिटिव्ह एनर्जी आज येथे मिळाली आहे.

नवनाथ दरेकर म्हणाले, डिजीटल युगात काम करत असताना सामाजिक बांधिलकी म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत संगणक आणि सॉफ्टवेअर कौशल्य प्रशिक्षण देण्यास सुरूवात झाली. या दरम्यान अनेक शेतकरी पालकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या त्यामुळे आपण योग्य काम करतोय याची खात्री झाली. पुढील काळात आणखी शेतकऱ्यांच्या मुलांना मदतीचा हात कसा देता येईल याचा प्रयत्न असेल.

प्रशांत दरेकर म्हणाले, नवनाथ यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील एका खेड्यांत शालेय शिक्षण घेतले. पुढे पुण्यात येऊन कष्टाने स्वतचे वेगळे स्थान निर्माण केले, नाव कमावले. आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून टयाने शेतकऱ्यांच्या मुलांसाठी मोफत तंत्रज्ञान प्रशिक्षण देण्याचा अभिनव उपरं राबविला, यातून हजारो कुटुंबाचा टॉ आधार बनला आहे, त्यांची वाटचाल पुढेही अशीच सुरू राहो अशा सदिच्छा त्यांनी दिल्या. या प्रसंगी यशस्वी विद्यार्थ्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

# जि.प.तील 'लाडक्या बहिणी' अडचणीत

**पुणे** - लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या आणि जिल्हा परिषदेत कामाला असलेल्या महिला अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावरी नियम नुसार कारवाई करण्याचे आदेश ग्रामविकास विभागाने सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहेत. महिला व बाल विकास विभागाने अशा ११८३ कर्मचाऱ्यांची यादी राज्य सरकारकडे सादर केली आहे. महिला आणि बाल विकास विभागाने माहिती आणि तंत्रज्ञान विभागाकडून याबाबतची माहिती मिळविली. या योजनेच्या अपात्रतेच्या अटीनुसार सदर अधिकारी, कर्मचारी पात्र नसताना सुद्धा या योजनेचा जाणीवपूर्वक लाभ घेऊन शासनाची दिशाभूल केल्याची बाब त्यांनी राज्य सरकारच्या निदर्शनास आणली. जिल्हा परिषदेच्या सीईओ यांनी याची दखल घेऊन संबंधितांविरुद्ध नियमानुसार कारवाई करावी आणि त्याचा अहवाल ग्रामविकास विभागाला कळवावा, असे नितीन पवार यांनी कळविले आहे.

# केरळमध्ये नारळ चोरांच्या टोळ्या सक्रिय : शेतकरी त्रस्त

**केरळ** - सोन्याच्या दागिन्यांची चोरी रोखण्यासाठी सशस्त्र रक्षक ठेवले जातात, परंतु केरळमध्ये द्रवरूप सोन्याचे रक्षण करण्यासाठी रात्री गस्त घालणे आवश्यक आहे, हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल. येथे द्रवरूप सोने म्हणजे नारळाचे तेल. सर्वाधिक नारळ उत्पादन करणाऱ्या केरळमध्ये नारळाच्या किमतीत २०० टक्के वाढ झाल्याने गोंधळ उडाला आहे. पूर्वी २५ रुपयांना विकले जाणारे नारळ आता ७० ते ८० रुपयांना विकले जात आहेत.

नारळाच्या किमती वाजवीपेक्षा अधिक वाढल्याने अनेक नारळ चोर टोळ्या सक्रिय झाल्या आहेत. रात्रीच्या अंधारात या टोळ्या नारळ फोडतात आणि उचलून घेऊन जातात. म्हणूनच शेतकरी लहान गट तयार करत आहेत आणि रात्री जागे राहत गस्त घालत आहेत. नारळ मल्याळी लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. केरळमध्ये वाढत्या प्रमाणात नारळ बाहेरील राज्यांत, देशांत पाठवले जातात.

केरळवासीयांच्या प्रत्येक पदार्थात नारळ असतो. ते नारळ पाणी पितात, नारळ खातात, जेवणात नारळाचे दूध वापरतात. नारळाच्या किमतींबरोबरच नारळाच्या तेलाची किंमत आता २०० रुपयांवरून ४०० रुपये प्रति लिटर झाली आहे. प्रीमियम ब्रँड तेलाची किंमत ७०० रुपयांपेक्षाही जास्त झाली आहे.

म्हणूनच केरळवासीय नारळाच्या तेलाला 'द्रवरूप सोने' असे संबोधतात. प्राचीन काळापासून नारळाचा वापर अन्नात तसेच धार्मिक विधींमध्ये केला जात आहे. लोक मंदिरात नारळ ठेक्तात आणि जेवणातही वापरतात, जन्मापासून मृत्यूपर्यंत आणि अन्नापासून ते आध्यात्मिक विधींपर्यंत वापरल्या जाणाऱ्या नारळ किंवा श्रीफळांना चोरीपासून वाचवण्यासाठी जपावे लागते आहे.

# बाबा नीळकंठ

साताऱ्यातील कोळे गावातून पुण्यात स्थायिक झालेल्या एका मध्यमवर्गीय कुटुंबात ७ जानेवारी १९४९ रोजी जन्म झाला - बाबा नीळकंठ कल्याणी यांचा. घरात शेती आणि हळदीचा छोटासा व्यवसाय. पण स्वप्न मात्र खूप मोठी होती. शालेय शिक्षण बेळगावच्या नॅशनल मिलिटरी स्कूल आणि पुण्याच्या नागरवाला शाळेत झालं. त्यानंतर BITS पिलानीम धून बीई ऑनर्स आणि थेट अमेरिकेतील MIT (Massachusetts Institute of Technology) मधून MS हे शिक्षण कोणालाही थक्क करेल.

१९७२ मध्ये वडिलांनी स्थापन केलेल्या भारत फोर्ज या कंपनीत त्यांनी प्रवेश केला. त्यावेळी एक स्थानिक कंपनी असलेली भारत फोर्ज, आज त्यांच्या नेतृत्वाखाली जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी फोर्जिंग कंपनी बनली आहे. २०२४-२५ मध्ये कंपनीचा टर्नओव्हर तब्बल १५,००० कोटी पर्यंत पोहोचला आहे.

भारत फोर्ज फक्त ऑटोमोटिव्हच नव्हे, तर डिफेन्स, एरोस्पेस, ऊर्जा, आणि तेल-गॅस क्षेत्रातही आघाडीवर आहे. त्यांनी इस्त्रायलच्या राफेल डिफेन्स कंपनीसोबत भागीदारी करून, भारतात तोफा आणि संरक्षण उपकरणे बनवण्यास सुरुवात केली. संरक्षण क्षेत्रातील स्वदेशीकरणाला त्यांनी नवे बळ दिले.

फक्त उद्योग नाही, तर पर्यावरणासाठीही त्यांनी पुढाकार घेतला. स्वतःची पवन टर्बाइन कंपनी - 'Kenersys' - स्थापन केली आणि उत्पादनासाठी हरित ऊर्जा वापरणाऱ्या पहिल्या कंपन्यांमध्ये भारत फोर्जचा समावेश झाला.

त्यांना भारत सरकारचा पद्म भूषण, तसेच जर्मनी, स्वीडन, जपान यांच्याकडून आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले.आज बाबा कल्याणी फक्त उद्योगपती नाहीत, तर प्रथम पुणे' या NGO मार्फत हजारो गरीब मुलांचं शिक्षण घडवणारे समाजसेवक आहेत. एक मराठी माणूस, ज्याने महाराष्ट्रात जन्म घेऊन, जगभरात भारताचा झेंडा फडकवीला.

# कबीर बेदी यांची नवी बायको मुलीपेक्षाही लहान

**मुंबई** - बॉलिवूड अभिनेता कबीर बेदी व त्यांच्या नव्या बायकोच्या वयात तब्बल २९ वर्षांचं अंतर आहे.

म्हणजेच कबीर बेदी यांची कन्या पूजा बेदी हिच्यापेक्षाही बेदी यांची बायको वयाने लहान आहे. या लग्नामुळे पुन्हा एकदा हा प्रश्न नव्याने चर्चेत आला आहे, की वयातल्या अंतराचा लग्नाच्या नात्यावर परिणाम होतो की नाही? रोचक गोष्ट म्हणजे या सेलिब्रिटींच्या जगात अशी अनेक उदाहरणे दिसतात;

जिथे वय हा मुद्दा उरलाच नाही. कबीर बेदी यांचे वैयक्तिक आयुष्य नेहमीच चर्चेत राहिले आहे, विशेषतः त्यांच्या प्रेमकथा. त्यांचे सध्याचे लग्न देखील चर्चेत होते कारण त्यात वयाचा मोठा फरक आहे. वयाच्या ७०व्या वर्षी कबीरने १६ जानेवारी २०१६ रोजी त्यांची दीर्घकाळाची जोडीदार परवीन दुसांजशी चौथे लग्न केले.




# आयएसबीअँडएम पुणे येथे आंतरराष्ट्रीय एफडीपीचे आयोजन

**पुणे :** इंटरनॅशनल स्कूल ऑफ बिझनेस अँड मीडिया (ISBM), पुणे येथे उत्कृष्ट दर्जाचे संशोधन डिझाईनिंग व पब्लिशिंग या विषयावर आंतरराष्ट्रीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम (FDP) २०२५ पार पडला. संस्थापक-अध्यक्ष डॉ. प्रमोद कुमार व डॉ. अरुण जोशी यांच्या सहकार्याने आयोजित या चार दिवसीय हायब्रीड कार्यक्रमात ६५ हून अधिक संशोधक सहभागी झाले.

या कार्यक्रमात डॉ. मीना बेईगी (साउथॅम्प्टन बिझनेस स्कूल, यूके), डॉ. रमाधार सिंह, डॉ. प्रवीण कुमार (बार्कलेज इंडिया) यांच्यासह आंतरराष्ट्रीय प्राध्यापकांनी संशोधन पद्धतीशास्त्र, डेटा ॲनॅलिटिक्स, Smart PLS, SPSS, बिब्लियोमेट्रिक्स व मेटा-ॲनॅलिसिस यावर मार्गदर्शन केले.

डॉ. अरुण जोशी यांनी सांगितले की एफडीपीचा उद्देश जिज्ञासा-केंद्री संशोधन संस्कृती विकसित करणे हा आहे. तर डॉ. प्रमोद कुमार म्हणाले, एक प्रभावी पीजीडीएम संस्था दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व व शैक्षणिक उत्कृष्टतेतून उद्याचे जागतिक बिझनेस लीडर्स घडवते. हे एफडीपी त्या ध्येयाचे प्रतीक आहे.

# त्या दुर्दैवी दिवशी राजीव गांधी यांनी राजभवनातून केले होते प्रस्थान

दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांची आज जयंती. राजीव गांधी यांचा, त्यांचे आजोबा पंडित जवाहरलाल नेहरू हयात असताना पासून राजभवनाशी अनेकदा संबंध आला.

राजीव गांधी यांचा जन्म मुंबई येथील ब्रीच कँडी हॉस्पिटल येथे सन १९४४ साली झाला. लहानपणी इंदिरा गांधी यांच्यासोबत अनेकदा ते येथे आले असल्याचे जुने लोक सांगतात. इंदिरा गांधी तर राजभवनातील खानसाम्याला नावाने ओळखत व आल्यावर विचारपूस करीत, असे सेवानिवृत्त लोक सांगतात.

पंतप्रधान होण्यापूर्वी राजीव गांधी एकदा मुंबईत आले असताना त्यांना काही कामाने वांद्रे येथे जायचे होते. राजभवनाचे वाहनचालक शिवराम कदम हे राजीव गांधी यांना देण्यात आलेल्या अम्बॅसेडर गाडीचे सारथ्य करीत होते.

त्या दिवशी राजीव गांधी यांनी शिवराम कदम यांना बाजूला बसण्यास सांगून स्वतःच गाडी चालवली. शिवराम कदम हे नेहमी सांगत की राजीव गांधी गाडी इतकी वेगाने चालवत होते की आपण जीव मुठीत धरून बसलो होतो !!

इंदिरा गांधी यांच्या निधनानंतर राजीव गांधी यांचा राजभवनाशी विशेष संबंध आला. पंतप्रधान झाल्यानंतर त्यांची एनएसजी सुरक्षाही वाढली होती.

सन १९८५ साली मुंबई येथे झालेल्या काँग्रेस शताब्दी अधिवेशनात सहभागी होण्यासाठी राजीव गांधी सपत्नीक आले असताना त्यांचा मुक्काम राजभवनातील पॉईंट बंगलो या अतिथीगृहात होता. राजीव गांधी यांच्या या भेटीच्या वेळी अभिनेते अमिताभ बच्चन व जया बच्चन उभयतांना भेटण्यासाठी येत अशी आठवण राजभवनातील सेवानिवृत्त जमादार विलास मोरे यांनी सांगितली.

राजीव गांधी यांच्या संदर्भात राजभवनाचे सेवानिवृत्त परिवार प्रबंधक जनार्दन संखे यांनी 'आठवणीतील राजभवन' या आपल्या आत्मचरित्रात्मक पुस्तकात लिहून ठेवलेली आठवण येथे देत आहे.

संखे यांच्या या आठवणी मुंबईच्या इतिहासाचे अभ्यासक व लेखक नितीन साळुंखे यांनी शब्दबद्ध केल्या आहेत.

संखे लिहितात: राजीव गांधींची एक आठवण मी कधीही विसरू शकणार नाही. मीच कशाला, राजभवनावरचा कोणीही अधिकारी - कर्मचारी ती आठवण कधीच विसरू शकत नाही. तारीख होती २१ मे १९९१.

आधल्या रात्री राजीव गांधी मुंबईतल्या राजभवनात मुक्कामाला होते. २१ मे रोजी विमानाने त्यांना विशाखापट्टणमला प्रचारसभेसाठी जायचे होते. २१ मे रोजी सकाळी त्यांचे सर्व कार्यक्रम आटोपून ते निरोप घेण्यासाठी राज्यपालांना भेटले.

त्यावेळी राज्यपाल सी. सुब्रमण्यम होते. आम्हीही तिथे उपस्थित होतो. राजीव गांधींनी नेहमीप्रमाणे माझ्याकडे पाहून ओळखीचं स्मित केलं. सर्वांना हात उंचावून अभिवादन करून ते गाडीत बसले.

राजीव गांधींचं वैशिष्ट्य म्हणजे ते गाडीत बसताना कधीही मागच्या सीटवर बसायचे नाही. नेहमी पुढे, ड्रायव्हरच्या शेजारी. तसेच ते त्यादिवशीही बसले आणि सांताक्रूझ विमानतळाच्या दिशेने निघून गेले. नेहमीच्या कामकाजात तो दिवस गेला आणि रात्री ती भयानक बातमी आली.

पेराम्बुदूर येथील प्रचारसभेला गेले असता, त्या ठिकाणी झालेल्या आत्मघातकी बॉम्बस्फोटात राजीव गांधी यांचा मृत्यू झाला होता.

काही काळ आमचा कानांवर विश्वासच बसेना. सकाळी पाहिलेला, आमच्याशी बोलून - हसलेला माणूस संध्याकाळी नाहीसा होतो, ही विश्वास ठेवण्यासारखी बातमी नव्हतीच.

एका राजस, हसतमुख व्यक्तीचा राजकारणाने दुर्दैवी बळी घेतला होता. राजभवनातून निघताना हात हलवून सुहास्य वदनाने आमचा निरोप घेताना, त्यांनी घेतलेला आमचा तो शेवटचा निरोप असेल याची पुसटशीही शंका आम्हाला तेव्हा आली नव्हती. राजीव गांधींसारख्या एका राजस व्यक्तिमत्त्वाचा अंत ज्या क्रूर पद्धीतीने झाला, तो चटका मात्र अजूनही मला अस्वस्थ करतो.

**उमेश काशीकर**

# सासू सासरे नको, मग अनाथ मुलाशी लग्न करा

### प्राजक्ता गांधी लिहितात परखडपणे....

१.तुम्ही तुमच्या आईबापाच्या काळजाचा तुकडा असता तसा तुमचा नवराही खूप लाडाकोडात वाढलेला असतो. त्यालाही कळा देऊनच आईने जन्माला घातलेला असतो. तुम्हाला वाटतं तसं गटाराच्या बाजूने उचलून आणलेला नसतो.

२. लग्नापर्यंत तो ही शिक्षण, करिअर, मित्रपरिवार यात छान बिझी असतो. तेव्हा संसार करायचा त्याचा अनुभव तुमच्यासोबतच सुरु होतो.

३. आईबापाच्या संसारात तुमचा जितका नॉमिनल रोल असतो तितकाच त्याचाही असतो. त्याला सगळंच समजायला हवं ही अपेक्षा आणि त्याला काहीच समजत नाही हा तर्क दोन्ही अतिरेकी आहेत.

४. तुमची पाळी आल्यावर तो तुमच्या उशापायथ्याशी बसेल, डोकं हातपाय चेपून देईल अशी अपेक्षा करु नका. लाखो मुलांना असा काही त्रास असतो हे माहीत नसतं. कारण त्यांच्या आईला(कदाचित् ) तेवढा त्रास झालेला नसतो. तेव्हा गेट व्होकल. तोंड उचकटून सांगायचं, अमुक कर किंवा तमुक कर. सांगायचंही नाही आणि केलं नाही म्हणून तोंड पाडून बसायचं हे जमणार नाही.

५. नव-याची आर्थिक लायकी काढताना, आपल्या बापाने आपल्याला काय लाईफस्टाईल दिलीय ते बघावं. आपण आपल्या हिमतीवर काय करु शकतो ते आजमावावं आणि मग विषय काढावा.

६. तुम्ही जसं उंची, अनुरुपता, पगार, स्थावर जंगम इस्टेट, घरातलं स्थान बघून लग्न करता तसं तो रुप, रंग, फिगर वगैरे बघून करतो. व्यवहार आहे तो. इमोशनल व्हायची गरज नाही. तुम्ही ठोकून वाजवून लग्न करणार आणि त्याने बघताक्षणी हो म्हणावं असं होत नसतं.

७. तुम्हाला तुमची आई प्रिय आहे तशी त्यालाही त्याची आई प्रिय आहे. तुमच्या आईला जसा लेकीच्या संसारात इंटरेस्ट असतो तसा त्याच्या आईलाही असतो. मुलगा म्हणजे काही देवीला सोडलेलं कोकरु नव्हे, विसरुन जायला. तो मजेत आहे न, त्याला काही त्रास नाही न हे वेळोवेळी त्याचे आईबाप चेक करणारच.

८. सासूसासरे नक्कोच असतील तर अनाथ मुलाशी लग्न करावं.

९. तुम्ही तासनतास आईशी बोलणार आणि तो दहा मिनीटं बोलला कि तुमचा जळफळाट होणार हे चालणार नाही. तुम्ही यायच्या खूप आधीपासून आई आहे त्याच्या आयुष्यात. तेव्हा शांत रहा. या मुद्द्यावरुन फालतू ब्लॅकमेलिंग करु नका.

१०. आईबरोबरच मित्र, मैत्रिणी ही त्याच्या जगण्याचा अविभाज्य भाग असणार. त्या बाबतीत अडवणूक नको.

११. दळण, लॉंड्री, स्वयंपाक, आला गेला, स्वच्छता, आर्थिक बाबी, प्रवासाचं नियोजन इ.इ. बाबींत परफेक्ट नॉलेज असणाराच नवरा हवा असेल तर विधुराशी किंवा घटस्फोटीत मुलाशी लग्न करावं. त्यांना नक्कीच जास्त अनुभव असतो.

१२. आणि परत एकदा, आपलं काय म्हणणं असेल ते समोरुन सांगावं. मुलांना आईने मनातलं ओळखून दाखव बरं सारखे फालतू गेम्स शिकवलेले नसतात. आणि हो, तुमच्या आईला त्याच्याकडून मान हवा असेल तर तुम्हीही त्याच्या आईशी नीट वागा.

**सौ प्रार्थना देशमुख**

# हायटेन्शन तारांना स्पर्श झाल्याने मायलेकी गंभीर जखमी



बुलडाणा : गेल्या काही दिवसांपासून राज्यातील विविध भागांत मुसळधार पाऊस होताना दिसत आहे. या पावसामुळे अनेक दुर्घटना होत असल्याचे समोर येत आहे. असे असताना आता बुलडाण्यात मायलेकीला विजेचा जोरदार धक्का बसला. घराच्या अगदी चार फूट अंतरावरून गेलेल्या अतिउच्च दाबाच्या विजतारांचा स्पर्श झाल्याने मायलेकी गंभीर जखमी झाल्या.

लक्ष्मी चव्हाण (वय ४०), मीना चव्हाण (वय १४) अशी जखमी झालेल्या मायलेकीचे नाव आहे. तालुक्यातील टुणकी येथील गजानन लोणकर यांच्या घरावरून उच्च दाबाच्या विजतारा गेल्या आहेत. गुरुवारी दुपारच्या सुमारास लोणकर यांच्या घराशेजारी राहणाऱ्या लक्ष्मी चव्हाण या कपडे वाळवण्यासाठी छतावर गेल्या असता त्यांच्या डोक्याला वीज तारेचा स्पर्श होऊन त्यांना जबर धक्का बसला. आपली आई धोक्यात असल्याचे पाहून धावून गेलेल्या मीनाला सुद्धा विजेचा शॉक बसला. या घटनेत तिचा डावा हात पूर्णपणे भाजला. त्यामुळे ती गंभीर जखमी झाली असून, तिच्या धाकट्या भावालाही दुखापत झाली आहे.

ग्रामस्थांच्या मदतीने जखमींना तातडीने शेगाव येथील खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले. या घटनेमधील आई व मुलगी दोघी अस्वस्थ असल्याने त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घरावरून गेलेल्या अतिउच्च दाबाच्या तारा हटविण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. विशेष म्हणजे टुनकी येथील घटनेपूर्वी वानखेड येथे दुर्लक्षितपणामुळे महावितरणच्या राजेंद्र देशमुख (वय ५०) यांचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला होता.

### विजेच्या धक्क्याने शेतकरी महिलेचा मृत्यू

दुसऱ्या एका घटनेत, संग्रामपूर तालुक्यातील मौजे दुर्गादैत्य येथील विज वितरण कंपनीच्या बेजबाबदार कारभारामुळे शेतकरी महिलेचा विद्युत ताराला स्पर्श होऊन जागीच मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. दुर्गादैत्य सुलोचना गजानन करोळे (वय ५८) ही महिला शेतीच्या कामासाठी गेली असता या महिलेला विद्युत तारेच्या स्पर्श झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.



सिंहगड रस्त्यावर पुणे बेंगलोर मार्गावर धायरी जवळ पुलावरून कार थेट कडेला असलेल्या झाडावर चढली आणि अडकून बसली. कोणतीही जीवित हानी झाली नाही परंतु पंधरा दिवसात गाडी शिकविणाऱ्या ड्रायविंग क्लास वाल्यांच्या नादाला लागून एका अर्धवट ड्रायवरची अशी परिस्थिती झाली.

## स्कूलबस चालकाचा मुलीवर बलात्कार

जळगाव - दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीवर स्कूलबस चालकानेच शेतात नेऊन बलात्कार केल्याची घटना पाचोरा तालुक्यात गेल्या महिन्यात घडली. याबाबत पिडीत मुलीच्या जबाबावरून बसचालकाला अटक करण्यात आली आहे.अबिद हुसेन शेख जलील (३८, रा. शेंदुर्णी, ता. जामनेर) असे या अटक करण्यात आलेल्या बसचालकाचे नाव आहे. त्याला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. पाचोरा तालुक्यातील एका गावातील मुले-मुली हे शिक्षणासाठी शेंदुर्णी, ता. जामनेर येथे स्कूल बसने दररोज ये-जा करतात.

# तारापूर एमआयडीसीमध्ये गॅस गळती

**पालघर :** पालघरमधील तारापूर-बोईसर औद्योगिक क्षेत्रातील एका औषध कंपनीत गॅस गळती झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेत चार कामगारांचा मृत्यू झाला असून, दोन जणांची प्रकृती गंभीर आहे. गुरुवारी दुपारी अडीच ते तीन वाजण्याच्या सुमारास तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्रमांक १३ येथील मेडले फार्मा कंपनीत नायट्रोजन रिक्शन टँकमधून गॅसची गळती झाली. या गळतीमुळे एकूण सहा कामगार बाधित झाले. त्यांना तातडीने शिंदे रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान, त्यातील चौघांचा मृत्यू झाला, तर इतर दोघांची प्रकृती गंभीर असून त्यांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले आहे. तर साक्षीदारांचे जबाब घेऊन गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे असे पालघर पोलिसांनी सांगितले आहे.

### मृत आणि जखमींची नावे

या घटनेत मृत्यू झालेल्यांमध्ये कल्पेश राऊत, बंगाली ठाकूर, धीरज प्रजापती आणि कमलेश यादव यांचा समावेश आहे. तर, रोहन शिंदे आणि निलेश हाडळ यांची प्रकृती गंभीर आहे. दरम्यान हा अपघात नेमका कसा झाला, वायु गळतीचं नेमकं कारण काय आहे? हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेलं नाहीये.

### जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाचे मत

पालघर जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाचे प्रमुख विवेकानंद कदम यांनी या घटनेची माहिती दिली. ते म्हणाले की, दुपारी सुमारे २:३० ते ३ च्या दरम्यान कंपनीतील नायट्रोजन गॅसची गळती झाली. यामुळे तेथे काम करणारे कामगार प्रभावित झाले.

सहा कामगारांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, जिथे सायंकाळी ६:१५ च्या सुमारास चौघांचा मृत्यू झाला. उर्वरित दोघांवर स्थानिक रुग्णालयातील ICU मध्ये उपचार सुरू आहेत. सर्व बाधित कामगारांना कारखान्यातून बाहेर काढून रुग्णालयात पोहोचवण्यात आले आहे.

# रायगड समुद्रात मासेमारी बोट बुडाली

**रायगड** – रायगड समुद्रात मासेमारी बोट बुडाल्याची घटना समोर आली आहे. यासंबंधीची माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. करंजा रिप्स येथे ही घटना घडली. दरम्यान, ही मासेमारी बोट गुजरातमधील असल्याचे समजते.



या घटनेची माहिती मिळताच, सीआयएसएफ आणि नौदलाच्या गस्त नौकांद्वारे बचावकार्य करण्यात आल्याचे सांगितले जाते. मात्र अपघात कशामुळे झाला, बोटीवर किती खलाशी होते? जीवितहानी झाली आहे का? किती नुकसान झाले? याबाबत काहीही उघड झालेले नाही. महत्त्वाची गोष्ट म्हणजे वादळी हवामानामुळे मासेमारी बंद आहे, बोटीला समुद्रात परवानगी नाही. या घटनेसंदर्भात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मत्स्य परवाना विभाग, कस्टम, पोलीस यांनी घटनेसंदर्भात सखोल चौकशी करावी, अशी मागणी कोळी बांधवांकडून करण्यात येत आहे.

### अपघातामागील कारणांचा तपास

रायगडमधील या बोटीचा अपघात नेमका कशामुळे झाला, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. समुद्रातील खराब हवामान, तांत्रिक बिघाड किंवा अन्य कारणांमुळे ही घटना घडली असावी, असे प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

नौदल आणि स्थानिक प्रशासनाने याबाबत तपास सुरू केला असून, लवकरच याबाबत अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. स्थानिक मच्छीमारांनी सांगितले की, समुद्रात गेल्या काही दिवसांपासून वादळी वारे आणि खराब हवामान आहे, ज्यामुळे मच्छीमारीसाठी धोका वाढला आहे.

या घटनेनंतर स्थानिक मच्छीमारांनीही बचावकार्यात सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यांनी आपल्या छोट्या बोटी आणि साधनांचा वापर करून खलाशांना वाचवण्याचे प्रयत्न केले. प्रशासनानेही सर्व यंत्रणा कार्यान्वित केल्या असून, हेलिकॉप्टर आणि इतर साधनांचा वापर करून बचावकार्य गतीमान केले आहे. रायगडच्या समुद्र किनाऱ्यावरील मच्छीमार समुदायात या घटनेमुळे भीतीचे वातावरण आहे.

### मोरा बंदरातील गुजरातच्या मच्छीमार बोटीतील एक खलाशी बेपत्ता

गेली ५ ते ६ दिवस उरण तालुक्यात व परिसरात जोरदार वादळ वारा व पाऊस सुरु आहे. वादळी वाऱ्यामुळे मोरा बंदरात आश्रयासाठी आलेल्या गुजरातील मच्छीमार बोटीतून एक खलाशी बेपत्ता झाला आहे.

भरतभाई डाल्की (४४) असे या बेपत्ता खलाशाचे नाव आहे. गुजरात राज्यातील वेरावल येथील भरतभाई कचराभाई डरी यांच्या मालकीची भवानी गंगा नावाची मच्छीमार बोट वादळी हवामानाच्या इशाऱ्यानंतर सुरक्षिततेसाठी मोरा बंदरात नांगर टाकून विसावली होती.

# पुण्याच्या सिरोलीत गणपती मांडत नाही

**पुणे** – पुण्यापासून शंभर किलोमीटर वर असलेल्या जुन्नर तालुक्यातील शिरोली गावात गणपती बाप्पा कोणाच्याही घरात बसविल्या जात नाही. याचे कारण फार पुरातन आहे. या गावात गणपतीची बहीण माळगंगा देवीचे स्थान आहे म्हणून बहिणीला भेटायला गणेश चतुर्थीच्या एक दिवस पहिले गणपती गावात येतो आणि जातो म्हणून गावात गणपती कोणीही स्थापना करत नाही.

शिरोली हे गाव धार्मिक परंपरा सण समारंभ साजरे करणारे गाव आहे. शेजारी अष्टविनायका मधील ओझर येथील विघ्नेश्वराचे जागृत देवस्थान आहे. आपली बहीण मळगंगा मातेला भेटायला गणपती शिरोली खुर्द येथे येत असतो. असे मानले जाते. म्हणूनच विघ्नेश्वर देवस्थानाची पालखी साडी चोळी घेऊन उत्सव मूर्तीला घेऊन सिरोलीला येतात. गावातील भाविक मनोभावे जागर करून गणपती बाप्पाचे स्वागत करतात. गुलाल उधळण होते वरणा पुरणाचा स्वयंपाक घरोघरी केला जातो. माहेरवासीन गावाला येतात. मळगंगा आणि गणपतीची भेट होते. त्यानंतर पालखी परत फिरते. या सोहळ्यामुळे गावात कोणीही गणपती मांडत नाही. आणि कोणी तसा प्रयत्न केल्यास त्याला गणपती बाप्पा धडा शिकवितात असे अनेक प्रकार घडले आहेत. असे हे शिरोली गाव आहे. आणखी मोरगावच्या मोरेश्वर गणपती मूळे तेथेही लोकं गणपती बसवत नाहीत.

# पारंपारिक साज; विश्वव्यापी ओळख



गणेशोत्सव हा केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नसलेला, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा होणारा एक अद्वितीय उत्सव आहे. सध्या हा उत्सव २२ देशांमध्ये धूमधडाक्यात साजरा होत आहे. घरगुती आणि सार्वजनिक पद्धतीने साजरा होणारा हा उत्सव आता राज्य सरकारच्या पाठिंब्याने अधिक व्यापक स्वरूपात साजरा केला जातो. धार्मिक सणाच्या व्यतिरिक्त तो समाजातील विविध घटकांना जोडणारा सांस्कृतिक महोत्सव म्हणून ओळखला जातो. गणेशोत्सवाचे स्वरूप केवळ मूर्ती स्थापनेपुरते मर्यादित नाही. आता हा उत्सव समाज, कला, शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि डिजिटल पातळीवर साजरा केला जातो. राज्य शासनाने तालुका ते राज्यस्तरीय स्पर्धांसाठी १० कोटी रुपयांची बक्षिसे जाहीर केले आहेत. या स्पर्धांमध्ये नाट्य, संगीत, चित्रकला, ब्लॉग लेखन, शैक्षणिक निबंध आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश आहे. समाजमाध्यमांच्या माध्यमातून या उपक्रमांची माहिती प्रसारित करून, संपूर्ण देश आणि जगभरातील सहभागी यांच्याशी उत्साहपूर्वक संवाद साधला जातो. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो सामाजिक एकात्मतेचा संदेश देतो. प्रत्येक विभागाने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले पाहिजे, जसे की नाट्य, संगीत, नृत्य आणि छायाचित्र प्रदर्शन. यामध्ये वर्ल्ड युनेस्कोचा दर्जा मिळालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकिल्ले, ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी संकल्पना यासारख्या विषयांवर कार्यक्रम सादर केले जातील. या प्रकारच्या उपक्रमांमुळे सामाजिक जागरूकता वाढते आणि लोकांमध्ये इतिहास, संस्कृती, तसेच देशभक्ती यांचा जिव्हाळा निर्माण होतो. गणेशोत्सवाच्या निमित्ताने घरगुती व सार्वजनिक कार्यक्रमांचे फोटो-व्हिडिओ जगभरातून अपलोड करण्यासाठी विशेष डिजिटल प्लॅटफॉर्म तयार केला जात आहे. उत्सवाच्या १० दिवसांच्या काळात प्रत्येक विभागाने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत माजी सैनिकांचा जिल्हानिहाय सत्कार करणे आवश्यक आहे. गणेशोत्सवाला राज्य महोत्सव दर्जा प्राप्त झाल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीला नवे पंख मिळाले आहेत.

## चांदी एक हजार रुपयांनी वधारली

**जळगाव :** चांदीच्या भावात शुक्रवारी एक हजार रुपयांची वाढ झाली. त्यामुळे चांदी एक लाख १५ हजार रुपये प्रतिकिलोवर पोहोचली. दोन दिवसांत चांदीमध्ये तीन हजार रुपयांची वाढ झाली. १८ ते २० ऑगस्टमध्ये चांदीचे भाव कमी-कमी होत गेले.

# आईचा खून करून मुलाची विक्री करणारी टोळी पोलिसांनी केली जेरबंद

**गोंदिया** – जिल्ह्यातील डुग्गीपार पोलीस स्टेशन अंतर्गत खजरी येथे ३ ऑगस्ट रोजी एका अनोळखी महिलेचा धारदार शस्त्रांनी हत्या झाली होती. या घटनेचा उलगडा गोंदिया पोलिसांनी लावला असून सदर महिला ही अनू ठाकूर असून या महिलेचे आरोपी अभिषेक तुरकर याच्यासोबत अनैतिक संबंध होते. अभिषेक हा कर्जात बुडालेला होता. पैसे मिळवण्यासाठी त्यांनी आपली पत्नी, बहीण आणि इतर लोकांच्या मदतीने अनु ठाकूर हिच्या ७ महिन्याचा मुलगा धनराज त्याची विक्री करून पैसे कमावण्याची योजना आखली. अनु ठाकूर हिला भिलाई वरून दुचाकी ने गोंदिया जिल्ह्यातील डुग्गीपार स्टेशन अंतर्गत खजरी या गावी आणले आणि तिचा धारदार शस्त्राने खून केला आणि पळून गेला. आणि तिच्या सात महिन्याच्या मुलाला गोंदिया येथे विक्री केली.

या योजनेत अभिषेक सह त्याची पत्नी,बहीण आणि इतर दोन महिला सह अजून दोघांचा सहभाग होता. या सर्वांना पोलिसांनी ताब्यात घेतलं असून पैशाच्या हव्यासापोटी मुलगा विक्री केल्याचे या तपासात निष्पन्न होऊन आरोपीला डुग्गीपार पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून पुढील तपास डुग्गीपार पोलीस स्टेशन करणार आहे.



# लाखो रुग्णांची नेत्रविकार सेवा घडावी : उपमुख्यमंत्री पवार

**पुणे** - डोळ्यांमुळे आपण सौंदर्य पाहतो. मात्र आजच्या धकाधकीच्या जीवनात मोतिबिंदूसह डोळ्यांचे इतर आजार होत आहेत. आता उपचारांमध्येही 'ए आय' चा वापर होत आहे. डॉ. अनिल दुधभाते यांनी शून्यातून विश्व निर्माण करत नेत्राची काळजी घेण्यासाठी डोळ्यांच्या सर्वच आजारांवर एकाच छताखाली सर्व प्रकारचे उपचार उपलब्ध करून देण्यासाठी दहा हजार फुटाचे सुसज्ज सेंटर उभारले आहे, त्यांच्याकडून सर्वसामान्यांची नेत्रसेवा घडावी, अशी भावना राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी व्यक्त केले.

माणिकबाग, सिंहगड रस्ता परिसरात आरोग्यसेवेची नवी पर्वणी ठरू शकेल अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटीना सेंटरचे उद्घाटन अजितदादा पवार यांच्या हस्ते रविवारी झाले, त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर, वडगाव शेरीचे आमदार बापूसाहेब पठारे, पद्मश्री डॉ. विकास महात्मे, राष्ट्रवादीचे माजी नेते काका चव्हाण, अनिल गोसावी, पीडिसीसी बँकेचे दिगंबर दुर्गाडे, विकास दांगट, प्रसन्न जगताप, प्रशांत जगताप, अशोक हरणावळ तसेच वैद्यकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

घरची प्रतिकूल परिस्थिती असताना डॉ. दुधभाते जिद्दीने शिक्षण पूर्ण करून डॉक्टर झाल्याबाबत अजित पवार यांनी कौतुक व्यक्त करत पुढे ते म्हणाले, डॉ. दुधभाते गरिबीतून आल्याने ते गोर गरीब लोकांना सवलतीच्या दरांत सेवा देत आहेत. येथील प्रत्येक नेत्र वैद्यकीय साधनांच्या किमती एक ते पाच कोटींच्या दरम्यान व त्या अमेरिकन बनावटीच्या आहेत. डॉ. दुधभाते नेत्रालय हे सर्वांना हक्काचे नेत्रालय झाले आहे. त्याचबरोबर त्यांनी मोफत नेत्रतपासणी करून काम करून सामाजिक भानही जपत डॉक्टरचे नव्हे तर सामाजिक कार्यकर्ता म्हणून काम पाहिले आहे. येथे लाखो लोकांचे नेत्रविकार दूर करण्याचे काम हे नेत्रालय करेल, अशा शुभेच्छा दिल्या.



डॉ. दुधभाते म्हणाले, सन २०११ मध्ये सिंहगड रस्ता परिसरात नेत्रालय सुरू केले होते. त्यानंतर आता १४ वर्षात स्वतःच्या या भव्य नेत्रालयाच्या वास्तूचे उद्घाटन आपल्या सर्वांच्या सहकार्याने करू शकलो. आम्ही येथे अत्याधुनिक सेवा देणार आहोत. खासकरून कांटूरा लॅसिक तंत्रज्ञान येथे आहे. गेली ४ वर्षे आम्ही ५०० मोफत नेत्र तापसणीद्वारे ५ लाख लोकांची मोफत नेत्र तपासणी केली. येथेही गरिबाला परवडेल अशा सेवा देणार आहे. कमीत कमी ५ हजार रुपयांमध्ये येथे मोतीबिंदू शस्त्रक्रिया असून येत्या काळात दुधभाते नेत्रालयाच्या चेन हॉस्पिटल सुरू करण्याची मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी अजित पवार यांच्या हस्ते डॉ. दुधभाते यांचे आईवडील धोंडीबा व पार्वती दुधभाते यांचा सत्कार करण्यात आला.

# सरकारची जुन्या वाहन धारकांसाठी खुशखबर

**मुंबई** – जुन्या वाहनधारकांसाठी आनंदाची बातमी आहे. केंद्र सरकारने १५ वर्षे जुन्या वाहनांची नोंदणी आता २० वर्षांपर्यंत वाढवण्यास परवानगी दिली आहे. हा निर्णय वाहनधारकांसाठी मोठा दिलासा देणारा ठरतोय, कारण अनेक घरांत जुने वाहन हे दैनिक वापरासाठी आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असतात. केंद्रीय मोटार वाहन नियम (तिसरी सुधारणा), २०२५ अंतर्गत हा नियम २० ऑगस्ट २०२५ पासून लागू झाला आहे आणि दिल्ली-एनसीआर वगळता देशभरातील सर्व राज्यांमध्ये याचा लाभ घेतला जाऊ शकतो. गेल्या काही वर्षांत, शहरांमध्ये वाढत्या वाहनांची संख्या आणि प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी जुन्या वाहनांवर काही बंदी घालण्यात आली होती. दिल्ली-एनसीआर मध्ये आधीच पेट्रोल वाहनांसाठी १५ वर्षे आणि डिझेल वाहनांसाठी १० वर्षे जुने वाहन वापरण्यावर बंदी आहे. मात्र, इतर राज्यांमध्ये या नियमामुळे वाहनधारकांना मोठा आर्थिक ताण पडत होता. जुना वाहन जुने झाले तरी अनेकांना ते दिवसेंदिवस आवश्यक होते. या नवीन सुधारणा नियमामुळे, जुना वाहन चालवण्याची परवानगी आणखी ५ वर्षे, म्हणजे २० वर्षांपर्यंत चालवता येईल, याची संधी मिळाली आहे. जुना वाहन आजही अनेक घरांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. शाळा-ऑफिस प्रवास, किराणा सामान घेणे, बाजारात जाणे, किंवा छोटे व्यवसाय चालवणे अशा अनेक कारणांमुळे जुने वाहन गरजेचे ठरते. अनेक वाहनधारकांसाठी नवीन वाहन घेणे आर्थिकदृष्ट्या कठीण असते, त्यामुळे जुने वाहन चालवण्याची परवानगी मिळाल्यामुळे त्यांचा मोठा फायदा होईल. जुना वाहन चालू ठेवण्यापूर्वी आर्थिक बचत होते तसेच वाहनधारकांच्या दैनंदिन जीवनात सुलभता येते. २० वर्षे जुने वाहन चालवण्यासाठी काही नियम निश्चित केले गेले आहेत. वाहन चालवण्यापूर्वी त्याची फिटनेस चाचणी उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. ही चाचणी मान्यताप्राप्त ऑटोमेटेड टेस्टिंग स्टेशन कडून करावी लागते. प्रत्येक ५ वर्षांनी ही नूतनीकरण प्रक्रिया पुन्हा करावी लागते. हे शुल्क वाहनाच्या दीर्घायुष्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे आहे.

# दगड विकणारी बाराशे कोटींची कंपनी

## साडेआठ हजाराला एक दगड

**मुंबई** – दुनिया झुकती हैं झुकाने वाला चाहिये! याला साजेसा आणि पोरकट प्रकार भारत देशात जोरात सुरू आहे. समुद्र किनारी किंवा नदी काठी मिळणारे गूळगुळीत दगड त्याला नकली दोन डोळे लावलेला दगड चक्क पेट रॉक नावाने साडे आठ हजाराला विकला जात आहे. या कंपनीची वार्षिक उलाढाल बाराशे कोटींची आहे. हे जगातील आठवे आश्यर्यच म्हणावे लागेल. केवळ घरात एकटे राहणाऱ्या लोकांना किंवा वृद्ध लोकांना घरात प्राणी पाळणे शक्य नाही अशांनी घरात हा दगड ठेवावा. हाच या मागचा बनवाबनविचा आर्थिक बाजार आहे.

अमेझॉन वर पेट रॉक नावाने सर्च केल्यास या फालतू व्येवसायाची व्याप्ती करोडोच्या घरात असल्याचे दिसून येईल. वास्तविक हा गुळगुळीत दगड समुद्र किनारी नदी काठी मोफत आणि ढीगाऱ्याने मिळते. त्याला पॉलिश करून दोन प्लास्टिकचे डोळे लावले जाते आणि तीस चाळीस रुपये पॅकिंगचा खर्च येतो ही वस्तू चक्क साडेआठ हजाराला खुलेआम विकली जाते. हे काम करणाऱ्या पेट रॉक कंपनीचा वर्षाचा धंदा बाराशे कोटीच्या घरात आहे.

केवळ घरात ज्यांना पाळीव प्राणी पाळणे शक्य नाही अशांनी घरात हा दगड ठेवावा त्याने प्राणी पाळल्याचा फील येतो असा कंपनीचा दावा आहे. वास्तुशास्त्रा प्रमाणे हा दगड घरात ठेवणे शुभ असल्याचे सांगण्यात येते परंतु हे सर्व थोतांड असल्याचे द स्टिंग ऑपरेशनच्या टीमने केलेल्या पाहणीत स्पष्ट झाले आहे.






## अनिलकुमार यांचे कार्य लंडनमध्ये झळकले

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष डॉ. अनिलकुमार बळीराम गायकवाड यांचा लंडन मध्ये महाराष्ट्र रत्न पुरस्काराने गौरव झाला. यावेळी सौ. अमृता फडणवीस, सिनेअभिनेते सुनील शेट्टी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या पुरस्कारामुळे जन्मभूमी लातूर मध्ये आनंदाचे वातावरण होते. डॉ. अनिलकुमार गायकवाड सामाजिक सेवाकुंड ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र भरात मिठाई वाटून आनंद साजरा केला.

# महाराष्ट्राचे आमदार महिन्याला सरकारचे ढापतात पावणेतीन लाख रुपये

## आमदारांचा पगार जिल्ह्याच्या कलेक्टर पेक्षा जास्त



**मुंबई** – आमदारांचेमूळ वेतन १,८२,२०० रूपये, महागाई भत्ता ३९,१४८ रूपये. इंटरनेटच्या जमान्यात १०,००० रुपये. आमदारांना टपाल भत्ता मिळतो. टेलीफोन भत्ता ८००० रूपये.

संगणक चालकाचा भत्ता १०,००० रूपये. हे सर्व मिळून आमदाराचा पगार होतो २,७२,१४८ रूपये. म्हणजे एका आमदाराचा पगार हा सर्वोच्य न्यायालयाचे सरन्यायाधीश किंवा जिल्ह्याच्या कलेक्टरपेक्षाही जास्त आहे. याशिवाय आमदारांच्या ड्रायव्हरला दरमहा २०,००० रूपये सरकारच्या म्हणजे आपल्या खिशातुनच दिला जातो. आम दारांच्या स्विय सहायकाला दरमहा ३०,००० रूपए ही आपले सरकारच देते. विशेष म्हणजे हे दोन्ही पगार आमदारांच्या पगारात येत नाहीत.



याखेरीज प्रत्येक बैठकीच भत्ता २००० रूपये आमदार निधीतून एक लॅपटॉप, एक कॉम्प्युटर आणि एक लेझर प्रिंटर मोफत, आयुष्यभर एस. टी. प्रवास मोफत, ठराविक रेल्वे प्रवास मोफत, राज्यांतर्गत ३२ वेळा विमान प्रवास मोफत तर राज्याबाहेर ८ वेळा विमान प्रवास मोफत.

# बनावट आधार कार्ड द्वारे कोट्यवधींचा विमा घोटाळा

- बनावट कागदपत्रे वापरून बँका आणि विमा कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांचे संघटित जाळे
- आयआयबीने १४.४ कोटी नोंदी तपासल्या व सुमारे ३ लाख संभाव्य खोटे दावे शोधले
- विम्याची रक्कम ५ वर्षांत १.७३ लाख कोटी रुपये इतकी होणार होती, जी कंपन्यांनी फसवणुकीत गमावली असती.




**मुंबई** – पत्त्यांच्या पिन कोडमध्ये फेरफार करून दशकभर फसवणूक करणाऱ्या टोळ्यांना आता विमा क्षेत्रात नवा मार्ग सापडला आहे. आधार कार्डवर आधारित प्रक्रियेचा गैरफायदा घेत, गुन्हेगार आता मोटर विम्यापासून आरोग्य विम्यापर्यंत विम्य खोटे दावे दाखल करत आहेत.

बनावट कागदपत्रे वापरत आधार डेटामध्ये बदल करून फसवणुकीची प्रकरणे सुरू आहेत. नुकतेच, यूपी पोलिसांनी काही विमा कंपन्यांना पत्रे पाठवून विम्याचे दावे करणारे ग्राहक आणि संबंधित अधिकाऱ्यांचे तपशील मागितले. या प्रकरणांमध्ये बनावट कागदपत्रे वापरत, बँका व विमा कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी केलेल्या संघटित फसवणुकीचा समावेश आहे. विमा क्षेत्रातील फसवणूक एकूण दाव्यांच्या १० ते १५ टक्के इतकी असल्याचा अंदाज आहे. विमा कंपन्या आता ही प्रकरणे नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

'फसवणुकीच्या प्रकरणांम धला 'आधार कार्ड' हा नवा व कमकुवत दुवा बनत आहे,' असे अनुकीर्ती शर्मा (ॲडिशनल एसपी) यांनी सांगितले.

'गुन्हेगार आता बनावट किंवा बदललेला आधार डेटा वापरून खोटी ओळख निर्माण करत आहेत. या ओळखीच्या आधारे पॉलिसी घेणे आणि खोटे दावे दाखल करून पैसे उकळणे सुरू आहे. अशा संघटित टोळ्या, आरोग्य आणि मोटर विम्यांशी संबंधित फसवणूक करत आहेत,'

अनेक विमा कंपन्यांनी असे प्रकार नोंदवले आहेत, जिथे आधारशी लिंक असलेले फोन नंबर किंवा ईमेल आयडी नोंदवले गेले आहेत. मात्र, खऱ्या पॉलिसीधारकांच्या संपर्क तपशीलाशी ते जुळत नाहीत.

# माहिती अधिकाराचा गळा घोटणाऱ्या आयोगाचा जनतेच्या हक्कावर डाका !

## अपील फेटाळून जनतेच्या प्रश्नांची गळचेपी, पारदर्शकतेला काळा फास




जर माहिती द्यायची नसेल तर सरळ कायदा बंद करा: कार्यकर्तेच नसेल तर आयोगाची गरज नाही. कायद्यात स्पष्ट नमूद आहे की माहिती न दिल्यास अधिकाऱ्याऱ्यांवर दंड करावा, पण महाराष्ट्रासारख्या राज्यात शेकडो प्रकरणे प्रलंबित असून दंडात्मक कारवाईची संख्या बोटावर मोजण्याइतकी आहे. याचा अर्थ आयोग जनतेच्या बाजूने उभा नाही तर अधिकाऱ्यांच्या बचावासाठी उभा आहे. खरेतर आयोग है पारदर्शकतेचे मंदिर असायला हवे होते, पण आज ते भ्रष्ट व्यवस्थेचे किल्ले बनले आहेत. आयोग म्हणजे माजी अधिकाऱ्यांचे निवृत्तीचे आश्रयस्थान झाले आहे. ज्यानी आयुष्यभर माहिती दडवली, भ्रष्टाचार फुलवला, जनतेला त्रास दिला त्यांनाच आयोगात बसवले जाते. मग हे लोक कार्यकर्त्यांना न्याय देतील कसे? ते आपल्या जुन्या सहका-यांचेच रक्षण करतात आणि जनतेच्या प्रश्नांची गळचेपी करतात आज कार्यकर्त्यांचा संताप उफाळून आला आहे. कोणी न्यायालयाच्या दारात धाव घेतली आहे, तर कोणी आंदोलनाच्या मार्गावर उतरले आहेत. अनेक कार्यकत्यांचा सूर स्पष्ट आहे

हा कायदा जर जिवंत ठेवायचा असेल तर आयोगाने तटस्थ व पारदर्शक कामगिरी करावी; अन्यथा कायदा बंद करा, कार्यकर्त्यांचा हा संताप केवळ वैयक्तिक नाही. तो लोकशाहीसाठी दिलेला इशारा आहे. कार्यकर्ते नाहीसे झाले तर माहिती अधिकार नावापुस्ता उरेल आणि लोकशाही गळफासात जाईल.

**छत्रपती संभाजीनगर** – माहिती अधिकार कायदा हा फक्त एक कायदा नाही तर तो लोकशाहीचा श्वास आहे. या कायद्यामुळेच सामान्य नागरिकाला सरकारला प्रश्न विचारण्याची ताकद मिळते, अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्याचा अधिकार मिळतो. सरकार माझ्या पैशाचा हिशोब द्या अशी मागणी करत कार्यकर्त्यांनी जीव धोक्यात घालून दिलेला हा कायदा आज वीस वर्षांनी श्वास गुदमरतो आहे. कारण, ज्या आयोगाने जनतेच्या प्रश्नांना न्याय द्यायला हवा होता तोच आता जनतेच्या हक्कांवर डाका टाकतो आहे.

राज्य माहिती आयोगाने अलीकडेच अनेक अपील फेटाळताना हास्यास्पद कारण दिले आहे. एका अर्जदाराकडून खूप अपीलं आली आहेत. हा युक्तिवाद म्हणजे लोकशाहीची चेष्टा आहे. कायद्याच्या तरतुदीनुसार आयोगाने प्रत्येक अर्ज वाचणे बंधनकारक आहे. अर्जात काय माहिती मागितली आहे, ती दिली गेली का नाही, याची कसून तपासणी आयोगाने करायला हवी. अर्जदाराने माहिती का मागितली, उद्देश काय, हेतू काय हे आयोगाने विचारने योग्य नाही. संबंधित माहिती अधिकाऱ्याला प्रश्न विचारला पाहिजे तुम्ही माहिती का दिली नाही? आणि माहिती न दिल्यास कायद्यातील कलम २० नुसार दंडात्मक कारवाई करणे ही आयोगाची जबाबदारी आहे. पण आयोग ही जबाबदारी पार पाडत नाही. अपील फेटाळून लावणे म्हणजे लोकशाहीच्या गळ्यावर थेट तलवार ठेवण्यासारखं आहे. माहिती अधिकार कायद्याचा जन्मच सामान्य कार्यकर्त्यांच्या रस्त्यावरच्या लक्धाने झाला, माझ्या पैशाचा हिशोब द्या या आंदोलनाने उभारलेला हा कायदा २००५ मध्ये संपूर्ण देशात लागू झाला. त्यावेळी अपेक्षा होती की, या कायद्यामुळे पारदर्शकतेची नवी पहाट उगवेल. भ्रष्टाचारावर लगाम बसेल. जनतेचा हक्क सुरक्षित होईल. पण आजच्या वास्तवात अधिकारी माहिती दडवतात, अर्जदारांना धमकावतात, कार्यकत्यांना गुन्हेगारी प्रकरणात अडकवतात, आणि आयोग या सर्व प्रकारावर पांघरूण घालतो.

भावपूर्ण श्रद्धांजली



आई दयेचा सागर...

काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते

श्री. विजय वडेट्टीवर

यांच्या मातोश्री

स्वर्गीय कमलाबाई नामदेवराव वडेट्टीवर

विनम्र अभिवादन

डॉ. अनिलकुमार गायकवाड सामाजिक सेवाकुंड ट्रस्ट

महाराष्ट्र राज्य

द स्टिंग ऑपरेशन हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ॲड. महेंद्र रामकृष्ण दलालकर यांनी श्रीहरी मीडिया पब्लिकेशन यांच्यासाठी राणे प्रकाशन, मुंबई, बेंगलोर फ्लायओवर ब्रिजसमोर, वारजे, पुणे ४११०५८ येथे छापून पुणे शहर कार्यालय, एन.के. इमेज, तिसरा मजला ग्राहक पेठे शेजारी, टिळक रोड पुणे ४११०३० येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक : श्री. नंदकिशोर रामदास शहाडे, समुह संपादक श्री. संजय मनोहर कर्णिक (संपादकीय जबाबदारी मुख्य संपादक यांच्यावर) कुठलाही वाद पुणे न्याय कक्षेत, व्यवस्थापन विभाग - ९३५६९२६३६१